
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ३२२
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ बुधवार, १० जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

किल्ले रायगडावर स्वच्छता अभियान/२
टँकरच्या धडकेत बियर शॉपी जमीनदोस्त/५
सिराजच्या जागी प्रसिद्ध कृष्णाचा संघात समावेश/८

## ‘पीओके’मध्ये हिंसाचार; ३० आंदोलकांचा मृत्यू



**काश्मीर :** पाकव्याप्त काश्मीर (पीओके)मध्ये आंदोलनकर्ते आणि पाकिस्तानी सुरक्षा दलाचे जवान यांच्यात झालेल्या चकमकीत सुमारे ३० जणांचा मृत्यू झाला असून २०० नागरिक जखमी झाले आहेत. जॉइंट आवामी ॲक्शन कमिटीने पाकव्याप्त काश्मीरमधील आर्थिक, राजकीय समस्यांवरून सरकारविरोधात काढलेला मोर्चा अवैध ठरवत बंदी घातली. यानंतर आंदोलनकर्ते आणि पाकिस्तानी जवानांमध्ये चकमक झाली. गेल्या आठवड्यात शुक्रवारी रात्री रावलकोट भागात एका व्यापाऱ्याची गोळी मारून हत्या करण्यात आली. प्रशासनाकडूनच ही हत्या करण्यात आल्याचा आरोप करण्यात आल्यानंतर रावलकोटसह मुझफ्फराबाद, कोटली, भीमबर, दाद्याल, पलांद्री, सुधनोटी येथे आंदोलक रस्त्यावर उतरले होते. त्यांनी पाकिस्तानी सरकार व लष्कराविरोधात घोषणा देत निदर्शने केली. यावेळी त्यांना लक्ष्य करण्यात आले.

# पनवेलच्या वीज समस्येवर उच्चस्तरीय बैठक

### ठोस उपाययोजना करण्याची आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी

### महावितरणने आराखडा तयार करावा –राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील ग्रामीण आणि शहरी भागात वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येसंदर्भात स्थानिक आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने मुंबईत ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि.९) महत्त्वपूर्ण बैठक झाली. यावेळी विजेच्या समस्येवर ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. त्यावर ऊर्जा राज्यमंत्री बोर्डीकर यांनी पनवेल परिसरातील वाढती लोकसंख्या आणि ग्राहकांची संख्या विचारात घेऊन महावितरणने आराखडा तयार करून सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश दिले.





नरिमन पॉइंट येथील निर्मल भवनमधील एमएसआरडीसी कार्यालयात झालेल्या या बैठकीला उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, पनवेलचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, नगरसेवक विकास घरत, प्रवीण पाटील, अजय बहिरा, सुमित झुंजारराव, दशरथ म्हात्रे, अरुणकुमार भगत, अमर पाटील, दिनेश खानावकर, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, रविनाथ पाटील, सुनील पाटील, विश्वजित पाटील, मुकेश फडके आदींसह महावितरणचे कार्यकारी संचालक धनंजय औंढीकर, भांडुप क्षेत्राचे मुख्य अभियंता संजय पाटील, वाशी मंडळाचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील, पनवेल शहरचे कार्यकारी अभियंता जितेंद्र माने उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, पनवेल तालुक्यातील ग्रामीण तसेच शहरी भागामध्ये मागील काही काळापासून वीजपुरवठा वारंवार खंडित होण्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त होत आहेत. महावितरणकडून उपलब्ध झालेल्या एप्रिल व मे २०२६ या कालावधीतील ट्रिपिंग अहवालाच्या अभ्यासातून पनवेल विभागातील वीज वितरण व्यवस्थेची चिंताजनक स्थिती समोर आली आहे. विशेषतः भिंगारी स्विचिंग स्टेशन, नवीन पनवेल सेक्टर ७, १५, पनवेल कल्पतरू रिव्हरसाइड, टपाल नाका जीआयएस, आकुर्ली, करंजाडे, वडघर आणि परिसरातील अनेक फीडर्सवर ट्रिपिंगची संख्या व कालावधी लक्षणीय प्रमाणात दिसून येतो. काही फीडर्सवर १३ ते २४ तासांपर्यंत वीजपुरवठा खंडित राहिल्याचे अहवालातून स्पष्ट होते. यामुळे नागरिक, व्यापारी, लघुउद्योग, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, गृहनिर्माण संस्था व सर्वसामान्य ग्राहक यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. (पान २ वर..)



## नवी मुंबई मेट्रो विस्ताराला मान्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी घोडबंदर रस्त्यावरील गायमुख ते फाउंटन हॉटेल भुयारी मार्ग व फाउंटन हॉटेल ते भाईंदर उन्नत पुलाच्या १७ हजार ३६ कोटी तसेच नवी मुंबई मेट्रो मार्ग १ए आणि मार्ग २च्या पाच हजार ५७५ कोटी अशा एकूण २२ हजार ६११ कोटी रुपयांच्या प्रस्तावांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीची बैठक मंगळवारी (दि.९) मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह प्रशासनातील विविध वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

गायमुख ते फाउंटन हॉटेलदरम्यान ५.८६ किलोमीटर लांबीचा सहा पदरी भुयारी मार्ग आणि फाउंटन हॉटेल ते भाईंदरदरम्यान ९.५८ किलोमीटर लांबीचा सहा पदरी उन्नत पूल उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे पश्चिम मुंबईला ठाणे, कल्याण–डोंबिवली, नाशिक, पनवेल तसेच राष्ट्रीय महामार्ग–४८च्या दृष्टीने अधिक वेगवान आणि सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध होईल. हा भुयारी मार्ग टीबीएम तंत्रज्ञानाद्वारे उभारण्यात येणार असून त्याचा व्यास १४ मीटर असेल. सुमारे पाच वर्षांत हा बोगदा पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, तर वसई खाडीला समांतर जाणाऱ्या उन्नत पुलावर ताशी १०० किलोमीटर वेगाने वाहतूक शक्य होणार आहे.

घोडबंदर मार्गावरील वाढती वाहतूक आणि जड वाहनांचा ताण कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार असून विशेषतः ठाणे व गुजरातच्या दिशेने जाणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणे शक्य होणार आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी सार्वजनिक–खासगी भागीदारी तत्त्वावर ‘बांधा–वापरा–हस्तांतरित करा’ मॉडेलद्वारे करण्यात येणार आहे. केंद्र व राज्य शासनाकडून ‘व्हायबिलिटी गॅप फंडिंग’ उपलब्ध करून देण्यात येणार आहे तसेच प्रकल्प परिसरात एमएमआरडीएला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी मान्यता दिली.

पायाभूत सुविधांचे प्रकल्प कार्यान्वित होणार असल्याने वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ आणि वेगवान होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

### असे असतील नवे मार्ग

सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग १ए (सागर संगम ते सीबीडी बेलापूर) आणि मेट्रो मार्ग २ (पेंधर ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टी–४) या प्रकल्पासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. या प्रकल्पामुळे सागर संगम ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा एकूण २८ किलोमीटरचा सलग मेट्रो मार्ग उपलब्ध होणार आहे. या विस्तारामध्ये मार्ग १ए वर दोन आणि मार्ग २ वर ११ स्थानकांचा समावेश आहे. भविष्यात दररोज सुमारे १२ लाख प्रवाशांना या मेट्रो सेवेचा लाभ मिळणार आहे.

## ‘नैना’संदर्भातील प्रलंबित प्रश्नांवर बैठक

### ग्रामस्थांची सहमती आणि संवादातून वाटचालीची अपेक्षा





**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नैना प्रकल्प परिसरातील ग्रामस्थांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सिडको भवनात सोमवारी (दि.८) बैठक झाली. यासंदर्भातील अंमलबजावणी ग्रामस्थांच्या सहमतीने आणि सातत्यपूर्ण संवादातून करण्यावर मंथन झाले.

या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल, नैना प्रकल्पातील अधिकारी आणि विविध गावांतील ग्रामस्थ उपस्थित होते.

पनवेल तालुक्यातील देवद, विचुंबे, आकुर्ली, सुकापूर, भोकरपाडा, चिपळेसह अन्य गावांतील ग्रामस्थांनी बैठकीत आपल्या समस्या आणि मागण्या मांडल्या. यावेळी भूखंड वाटप प्रक्रियेदरम्यान शेतकऱ्यांवर झालेला अन्याय दूर करणे, गावठाणांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, यूडीसीपीआरमधील संबंधित तरतुदींची अंमलबजावणी करणे तसेच बाधित घरांना योग्य मोबदला देण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. (पान २ वर..)

## निवडक

### राज्यसभा निवडणुकीत काँग्रेसला धक्का! उमेदवाराचा अर्ज बाद

**भोपाळ :** मध्य प्रदेशच्या राज्यसभा निवडणुकीत काँग्रेसला धक्का बसला आहे. या पक्षाच्या राज्यसभा उमेदवार मीनाक्षी नटराजन यांचा अर्ज छाननीत बाद झाला. त्यांनी उमेदवारी अर्जाबरोबर सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात एका खटल्याची माहिती दडपल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आल्याने त्यांचा अर्ज फेटाळण्यात आला. त्यामुळे मध्य प्रदेशातील राज्यसभेच्या तिसऱ्या जागेची लढत संपल्यात जमा आहे. विरोधी पक्षाचा उमेदवारी अर्ज रद्द झाल्याने भाजप उमेदवार महेश केवट यांची बिनविरोध निवड होणे निश्चित मानले जात आहे.

### फटाक्यांच्या गोदामाला भीषण आग; सात जणांचा होरपळून मृत्यू

**जयपूर :** राजस्थानमधील जयपूर येथील खोह नागोरियन परिसरात असलेल्या एका फटाक्याच्या गोदामाला मंगळवारी (दि.९) भीषण आग लागली. या दुर्घटनेत सात जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. आयेशा नगर तलाई कॉलनीतील एका लहान घराचा बेकायदेशीरपणे गोदाम म्हणून वापर केला जात होता, जिथे फटाके साठवून ठेवले होते. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# २०१७ आणि २०१९मधील पात्र शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ

### मंत्रिमंडळ बैठकीत शिक्कामोर्तब

**मुंबई : प्रतिनिधी**

२०१७ आणि २०१९मधील कर्जमाफी योजनांमध्ये तांत्रिक अडचणी किंवा इतर कारणांमुळे पात्र असूनही लाभापासून वंचित राहिलेल्या पाच लाखांहून अधिक शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय मंगळवारी (दि.९) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडलेल्या या बैठकीत या प्रस्तावावर शिक्कामोर्तब करण्यात आले असून यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर सुमारे १४ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडणार आहे.

गेल्या काही काळापासून विविध संकटांचा सामना करत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पामधून अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणा केलेली आहे. त्याआधी २०१७ आणि २०१९च्या कर्जमाफी योजनेत अनेक शेतकरी पात्र ठरले होते, मात्र बँकांच्या तांत्रिक त्रुटी आणि विविध नियमांच्या कचाट्यात अडकल्याने त्यांना प्रत्यक्षात लाभ मिळाला नव्हता. या वंचित शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी राज्यभरातून वारंवार मागणी होत होती. या पार्श्वभूमीवर सरकारने पाच लाख शेतकऱ्यांच्या थकीत कर्जाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी हे मोठे विशेष आर्थिक पॅकेज मंजूर केले आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. राष्ट्रीयकृत, खासगी आणि ग्रामीण बँकांकडे असलेल्या शेतकऱ्यांच्या पीक कर्ज किंवा पुनर्गठित अनुत्पादित (एनपीए) कर्जांना कर्जमुक्तीचा लाभ दिला जाईल. बँकांच्या कर्ज खात्यातील शिल्लक रकमेवर तडजोड करून निश्चित टक्केवारीनुसार सूट मिळवण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती बँकांशी वाटाघाटी करेल. या समितीत प्रधान सचिव (सहकार), महा–आयटीचे व्यवस्थापकीय संचालक आणि सहकार आयुक्तांचा समावेश असेल.

### मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना

प्रशासकीय कामकाजात गतिमानता आणि सुसूत्रता येण्यासाठी मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे सध्या अस्तित्वात असणाऱ्या ३३ प्रशासकीय विभागांची संख्या ४५ होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ईज ऑफ डुईंग बिझनेस आणि ईज ऑफ लिव्हिंग संकल्पनेवर भर देण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार मंत्रालयीन विभागात सुसूत्रता आणण्यासाठी पुनर्रचना करण्यात आली. यामुळे निर्णय घेण्याची प्रक्रिया वेगवान होईल तसेच योजनांची अंमलबजावणी आणि क्षेत्रीय यंत्रणांशी प्रभावी समन्वय साधणे शक्य होणार आहे. (सविस्तर वृत्त पान २ वर..)


## भावपूर्ण श्रद्धांजली

जगी ऐसा बाप व्हावा ।
ज्याचा वंश मुक्तीस जावा ।।



### स्व. कान्हाशेठ हरी ठाकूर

बुधवार दि. ०३/०६/२०२६ रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७४ व्या वर्षी श्री माऊली चरणी विलीन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरंतर शांती लाभो हिच माऊली चरणी प्रार्थना!
तुका म्हणे पावठणी । करू स्वर्गाची निशाणी ।।

| वार | दिनांक | भजन मंडळाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|
| बुधवार | १०/०६/२०२६ | श्री. दत्त प्रासादिक भजन मंडळ - कोपर<br>बुवा - ह.भ.प. वसंतशेठ पाटील, पखवाज - वैष्णव देशमुख | सायं. ७ ते ८.३० वा. |
| गुरूवार | ११/०६/२०२६ | श्री. नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ - कोपरा<br>गायिका - सौ. शिवमाला पाटील, पखवाज- निलेश पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| शुक्रवार | १२/०६/२०२६ | दत्त प्रासादिक भजन मंडळ - आदई<br>बुवा - श्री. गणपत म्हात्रे, पखवाज - चेतन पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| शनिवार | १३/०६/२०२६ | नादब्रम्ह साधना मंडळ - खारघर<br>गुरूवर्य श्री.निवृत्ती बुवा चौधरी, पखवाज - निलेश पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| रविवार | १४/०६/२०२६ | हनुमान प्रासादिक भजन मंडळ - पडघे<br>संगीत रत्न श्री. शंकुनाथ बुवा पडघेकर,<br>पखवाज - किशोर पाटील, चालक - पांडुशेठ भोईर | सायं. ७ ते ८.३० वा. |

सोमवार | १५/०६/२०२६



हरि किर्तन

सकाळी -१०:०० ते १२:००
किर्तनकार -ह.भ.प. वैभव बुवा मंडलिक,
पखवाज साथ - श्री. सुधीर भाऊ कराळे,
तबला साथ - श्री. दिगंबर गायकर,
सहगायक -श्री. अनिल यशवंतराव,
श्री हर्षल घुढे,
सिंथेसाईझर - श्री. दर्शन वाघचौडे



* किर्तनकार *
ह.भ.प. वैभव बुवा मंडलिक

शोकाकुल – समस्त ठाकूर परिवार

टिप - कोणत्याही प्रकारचे दुःखवटे स्वीकारले जाणार नाहीत.



## यंदाच्या पावसाळ्यात समुद्राला २४ दिवस मोठी भरती

### १६ जुलैला सर्वांत मोठे उधाण

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकणात मोसमी पावसाचे आगमन झाले आहे. यंदाच्या पावसाळ्यात समुद्राला २४ दिवस मोठी भरती येणार असून यामध्ये १६ जुलै रोजी सर्वांत मोठी भरती येणार आहे. रायगड जिल्ह्यात समुद्रकिनाऱ्यावर ४६, तर खाडीकिनाऱ्यावर ९९ गावे आहेत. या सर्व १४५ गावांनी उधाणाच्या वेळी सतर्क राहण्याचे आवाहन आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आले आहे.

महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडील वेळापत्रकानुसार यंदाच्या पावसाळ्यात समुद्राला २४ दिवस मोठी भरती येणार आहे. जून आणि जुलै महिन्यात प्रत्येकी सहा दिवस, ऑगस्ट महिन्यात पाच दिवस, तर सप्टेंबर महिन्यात सात दिवस समुद्राला मोठी भरती येणार आहे. या २५ दिवसांमध्ये समुद्रात साडेचार मीटरपेक्षा मोठ्या लाटा उसळतील. सर्वांत मोठी भरती १६ जुलै रोजी येणार आहे. या दिवशी समुद्रात ४.८९ मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत.



पावसाळ्यात अनेकदा नद्यांना पूर येतो. त्यात समुद्राला भरती असेल, तर हा पूर ओसरण्यास उशीर होतो. त्यामुळे खाडी व समुद्रकिनाऱ्यालगतच्या गावांना धोका पोहचतो. रायगड जिल्ह्यात समुद्रकिनाऱ्यावर ४६ आणि खाडीकिनाऱ्यावर ९९ गावे आहेत. या सर्व १४५ गावांना मोठ्या भरतीच्या वेळी धोका होऊ शकतो. अशात मुसळधार पाऊस पडल्यास या गावांना पूरस्थितीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. विशेषतः खाडी किनाऱ्यावरील गावातील मानवी वस्त्यांमध्ये उधाणाचे पाणी शिरून नुकसान होण्याची शक्यता जास्त असते.

किनारी गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाल्यास करावयाच्या उपाययोजनांची तयारी संबंधित जिल्ह्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागांनी सुरू केली आहे. तालुका स्तरावरून अद्ययावत आपत्ती व्यवस्थापन आराखडे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागांनी मागविले असून ते आल्यानंतर पावसाळ्यापूर्वी जिल्ह्यांचे आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करण्यात येणार आहेत.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी आज करणार महाविक्रम



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या राजकारणात १० जून रोजी एक महत्त्वाचा टप्पा नोंदवला जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा दीर्घकाळ टिकलेला विक्रम मागे टाकत देशातील सर्वाधिक काळ कार्यरत असलेले निवडून आलेले पंतप्रधान ठरणार आहेत.

२६ मे २०१४ रोजी प्रथमच पंतप्रधानपदाची शपथ घेतलेल्या नरेंद्र मोदी यांनी त्यानंतर सलग दोन लोकसभा निवडणुकांमध्ये विजय मिळवत केंद्रातील सत्ता कायम राखली. बुधवारी त्यांच्या पंतप्रधानपदाचा सलग ४,३९९वा दिवस पूर्ण होईल. यासह ते पंडित नेहरू यांच्या ४,३९८ दिवसांच्या निवडून आलेल्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळाला मागे टाकतील.

यापूर्वी पंतप्रधान मोदींनी पं. नेहरू यांच्या सलग तीन निवडणूक विजयांच्या विक्रमाशी बरोबरी केली होती. आता सलग निर्वाचित कार्यकाळाच्या बाबतीत ते अव्वल स्थानी पोहचले आहेत. विशेष म्हणजे पंतप्रधान मोदींच्या तिसऱ्या कार्यकाळाला मंगळवारी यशस्वी दोन वर्षे पूर्ण झाली.

# प्रशासकीय गतिमानतेसाठी मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना

## उपविभागांचे स्वतंत्र विभाग; विभागांची संख्या ४५ होणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ईज ऑफ डुईंग बिझनेस आणि ईज ऑफ लिव्हिंग संकल्पनेवर भर देण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार मंत्रालयीन विभागात सुसूत्रता आणण्यासाठी पुनर्रचना करण्यात आली. यामुळे निर्णय घेण्याची प्रक्रिया वेगवान होईल, योजनांची अंमलबजावणी आणि क्षेत्रीय यंत्रणांशी प्रभावी समन्वय साधणे शक्य होणार आहे.

सध्या मंत्रालयात ३३ प्रशासकीय विभाग होते. यामध्ये एकाच विभागात दोन अथवा तीन उपविभाग होते. उपविभाग दोन किंवा तीन असले तरी विभागाची आस्थापना एकाच विभागप्रमुखांकडे असते. यामुळे मनुष्यबळाच्या वितरणात अडचणी निर्माण होत असत. त्याचबरोबर उपविभागाचे कामकाजाचे स्वरूप भिन्न आणि स्वतंत्र आहे त्यानुसार उपविभागात स्वतंत्र सचिवामार्फत कामकाज हाताळण्यात येते.



यामुळे विभागांचे सुसूत्रीकरण करुन कार्यक्षमता सुधारण्यासाठी विभागांच्या विषयांच्या कार्यासनासह पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला. नवीन विभागांकरिता स्वतंत्र आस्थापना, रोख शाखा आणि नोंदणी शाखा यासाठी स्वतंत्र व्यवस्था असेल.

मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना करताना नवीन पदनिर्मिती केली जाणार नाही. संबंधित विभागातील मंजूर व रिक्त अधिकारी, कर्मचारी यांची संख्या विचारात घेऊन ती पदे नवीन निर्माण करण्यात आलेल्या विभागांना मंजूर संख्येनुसार प्रमाणशीर तत्वावर वाटप करण्यात येतील. सध्या अस्तित्वात असलेल्या विभागांचे विभाजन करून पुढीलप्रमाणे कार्यासनासह नवीन विभाग निर्माण होतील. कृषि व पदुम विभागाचे विभाजन करुन कृषि विभाग आणि पदुम विभाग असे दोन स्वतंत्र विभाग होतील. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे विभाजन स्वतंत्र सहकार विभाग, पणन विभाग आणि वस्त्रोद्योग विभाग असे तीन स्वतंत्र विभाग.

सामान्य प्रशासन विभागातून स्वतंत्र राजशिष्टाचार विभाग. गृह विभागातून स्वतंत्र परिवहन विभाग. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाचे विभाजन करुन उद्योग व खनिकर्म विभाग, ऊर्जा विभाग आणि कामगार विभाग असे तीन स्वतंत्र विभाग. महसूल व वन विभागाचे विभाजन करुन महसूल विभाग, मदत व पुनर्वसन विभाग आणि वन विभाग असे तीन स्वतंत्र विभाग.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे विभाजन करुन शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग असे दोन स्वतंत्र विभाग.पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे विभाजन करुन सांस्कृतिक कार्य विभाग आणि पर्यटन विभाग असे दोन स्वतंत्र विभाग.वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे विभाजन करुन स्वतंत्र अन्न व औषध प्रशासन विभाग होतील.नियोजन विभागातील रोजगार हमी योजना उपविभागाचा समावेश मृद व जलसंधारण विभागामध्ये करण्यात आला आहे.

मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे विभाजन, नवीन विभागांची निर्मिती, त्यांच्याबाबतची अधिसूचना प्रशासकीय सुधारणा, नाविण्यता, उद्योजकता व सुधारणा या उपविभाग (कार्यासन रचना व कार्यपध्दती) काढण्यात येईल.

**महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७मध्ये सुधारणा**

केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७मधील तरतुदींशी सुसंगत आणि सुसूत्रतेसाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. वस्तू व सेवा कर परिषदेच्या ५६व्या बैठकीमध्ये भारत सरकारने केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७च्या विविध कलमांमध्ये सुधारणा केलेल्या आहेत.

# पढवण पुलावर रेलिंग न बसवल्यास अपघाताचा धोका

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यासाठी अत्यंत महत्वाचा असणारा रोहा– पढवण –तळा हा महत्वाचा रहदारीचा रस्ता असून या रस्तावरील पढवण येथे असणाऱ्या पुलाचे कठडे १७ जुलै २०२५ रोजी पडलेल्या संततधार पावसामुळे वाहून गेले होते.त्यामुळे हा पुल धोकादायक बनला होता.



या मार्गावरील प्रवाशी व नागरिकांनी अपघात होऊ नये यादृष्टीने बांधकाम विभागाने त्वरीत व्यवस्था करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली त्या नुसार दोन्ही बाजूला तात्पुरत्या स्वरूपात त्यावेळी लोखंडी टी ऍंगल बसविले आहेत.थोड्या प्रमाणात का होईना धोका टळला आहे .मात्र या पुलावरुन मुसळधार पाऊस पडला की पाणी जाते. असे पावसाळ्यात पुलावरून अनेक वेळा पाणी जात असल्याने या लोखंडी ऍंगलला रॅलींग असणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रवासी वर्गातून बोलले जात आहे.

तसेच ही रॅलींग पावसाळ्यापुर्वी बसविली जाईल असे प्रवासी व नागरिकांना अपेक्षा होती.परंतु ती न बसविल्याने आता तरी काही दिवस उरले असताना ते काम पूर्ण करावे अशी मागणी होत आहे.सदर पुलाचे कठडे वाहून गेले त्यावेळी प्रवासी व नागरिकांनी अनेक ठिकाणी संपर्क साधून विषय घेतल्या नंतर बांधकाम विभागाने हे काम केले होते हे काम पावसाळ्यापूर्वी करणे अपेक्षित असताना बांधकाम विभागाने याकडे जाणीवपूर्वक तर दुर्लक्ष केले नाही ना असा प्रश्न नागरिकांतून होत आहे.

# बळीराजा पावसाच्या प्रतीक्षेत



**खोपोली : प्रतिनिधी**

मान्सूनचे आगमन जवळ आले असले तरी अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत.खरीप हंगामाची तयारी पूर्ण झाली असून अनेक शेतकऱ्यांनी नांगरणी,वखरणी आणि इतर पूर्वमशागतीची कामे उरकली आहेत.मात्र पावसाने हजेरी न लावल्याने पेरणीची कामे रखडली आहेत.

जून महिना सुरू होताच शेतकऱ्यांमध्ये शेतीकामांची लगबग वाढते.बियाणे, खते आणि औषधांची खरेदी करून शेतकरी पावसाची प्रतीक्षा करत आहेत. काही ठिकाणी हलक्या सरी कोसळल्या असल्या तरी मोठ्या प्रमाणावर पेरणी करण्याइतका पाऊस झालेला नाही. त्यामुळे शेतकरी चिंतेत असून लवकरच दमदार पाऊस पडावा,अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत.

शेती हा पावसावर अवलंबून असलेला प्रमुख व्यवसाय असल्याने वेळेवर आणि पुरेसा पाऊस पडणे अत्यंत आवश्यक आहे.पाऊस लांबल्यास पेरणीत विलंब होऊन उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने शेतकरी वर्ग सध्या चिंताग्रस्त आहे.त्यामुळे "कधी बरसणार मेघराजा ?" हा प्रश्न सध्या प्रत्येक शेतकऱ्याच्या मनात आहे.

# लोहाणा येथे ४४वे अखंडित नेत्र शिबिर

**खोपोली : प्रातिनिधी**

लोहाणा महाजनवाडी समाज ट्रस्ट,आर झूनझूनवाला– शंकरा आय हॉस्पिटल–नवीन पनवेल व बुज हास्य क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने विनामूल्य नेत्र तपासणी व विनामूल्य मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर सोमवार रोजी झाले. प्रतिमाह प्रमाणे लोहाणामध्ये हे ४४ वे अखंडित शिबीर होते. अशी माहिती बाबुभाई ओसवाल यांनी दिली.लोहाणा महाजन समाज ट्रस्ट अध्यक्ष शैलेशभाई विठलाणी, संजय तन्ना व बुज हास्य क्लब संस्थापक.बाबुभाई ओसवाल यांच्या अधिपत्याखाली सदरहू शिबिरात ४५ नेत्र रुग्ण तपासले गेले ,त्यापैकी ११ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पनवेल येथे रवाना केले.



# मुंबई विद्यापीठाचे किल्ले रायगडावर स्वच्छता अभियान

**रोहा : प्रतिनिधी**

शिवराज्याभिषेक सोहळ्यानंतर किल्ले रायगडावर होणाऱ्या कचऱ्याचे संकलन व व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष,विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.रविंद्र कुळकर्णी यांच्या नियोजन व मार्गदर्शनाने 'स्वच्छता ही सेवा, या संकल्पनेला अनुसरून किल्ले रायगडावर स्वच्छता अभियान राबविण्यात आला.



या स्वच्छता अभियानाची सुरवात मुंबई विद्यापीठाचे प्र– कुलगुरू प्राचार्य डॉ.अजय भामरे यांच्या मार्गदर्शनाने झाली. या प्रसंगी मुंबई विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य मिलिंद साटम, शीतल देवरुखकर, मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे विशेष कार्य अधिकारी प्रा. सुशील शिंदे,मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रमेश देवकर,सोनपंत दांडेकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महेश देशमुख , राष्ट्रीय सेवा योजनेचे रायगड जिल्हा समन्वयक प्रा.तुळशिदास मोकल, विभागीय समन्वयक डॉ. प्रवीण गायकवाड, डॉ. दत्ता हिंगमिरे, डॉ. राम बरकुळे, डॉ. तुकाराम माळवे आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्वच्छता अभियानात रायगड जिल्ह्यातील जे. एस. एम. महाविद्यालय अलिबाग, को.ए.सो.आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालय नागोठणे,पी. एन. पी. महाविद्यालय वेशवी,डॉ.नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालय कोलाड,जे. एन.पालीवाला महाविद्यालय पाली,सुंदरराव मोरे महाविद्यालय पोलादपूर, दोशी वकील महाविद्यालय गोरेगांव, डी. डी.विसपुते फार्मसी महाविद्यालय विचुंबे, एम.एम. जगताप महाविद्यालय महाड, टीकमभाई मेहता महाविद्यालय माणगाव, भाऊसाहेब नेने महाविद्यालय, पेण, अंजुमन इस्लाम डिग्री महाविद्यालय, मुरुड, सी. के. टी. महाविद्यालय पनवेल, हिरवळ संस्था महाविद्यालय, महाड, के. एल. इ. महाविद्यालय कळंबोळी, शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालय कळंबोळी, कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय उरण, पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालय पनवेल,पिल्लई एच.ओ.सी महाविद्यालय रसायनी, कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालय कर्जत,वीर वाझेकर महाविद्यालय उरण ही महाविद्यालये व या महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे ५०० स्वयंसेवक तसेच मुंबई विद्यापीठाचे २५ कार्यक्रम व्यवस्थापन अधिकारी व ६५ कर्मचारी सहभागी झाले होते.

या स्वच्छता अभियानात सहभागी स्वयंसेवकांनी हत्ती तलाव,गंगा सागर तलाव, राजभवन,राज सभा, नगारखाना, बाजारपेठ, होळीचा माळ, शिरकाई देऊळ,जगदीश्वर मंदिर, समाधी स्थळ, टकमक टोक आदी ठिकाणच्या परिसराची स्वच्छता केली.या अभियानात सहभागी स्वयंसेवकांनी कचरा संकलन व कचरा व्यवस्थापन प्रक्रियेसाठी महत्वपूर्ण योगदान दिले. स्वच्छता अभियान समारोप कार्यक्रमात सहभागी झालेल्या महाविद्यालयांचे, कार्यक्रम अधिकाऱ्यांचे व स्वयंसेवकांचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.अजय भामरे सरांनी कौतुक केले.

# वैश्विक ओळखपत्र अर्ज क्रमांक अद्ययावत करण्यास १५ जुलैपर्यंत मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या विशेष सहाय्य योजनेचा लाभ घेणाऱ्या आणि अद्याप वैश्विक ओळखपत्र (यूडीआयडी) प्राप्त न केलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महाडीबीटी पोर्टलच्या तांत्रिक अद्ययावतीकरणामुळे लाभार्थ्यांना त्यांचा अर्ज क्रमांक एसएएस पोर्टलवर अद्ययावत करण्यासाठी आता १५ जुलै २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या १५ मे २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, यूडीआयडी ओळखपत्र नसलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांनी १५ जून २०२६ पर्यंत स्वावलंबन पोर्टलवर अर्ज करून त्यांचा अर्ज क्रमांक एसएएस पोर्टलवर अद्ययावत करणे आवश्यक होते. या प्रक्रियेच्या अंमलबजावणीची जबाबदारी नायब तहसीलदार (विशेष सहाय्य योजना) यांच्याकडे सोपविण्यात आली होती. मात्र, माहिती व तंत्रज्ञान महामंडळाकडून प्राप्त माहितीनुसार, विद्यमान महाडीबीटी पोर्टलचे 'महाडीबीटी २.०' या नव्या व अधिक प्रगत प्रणालीमध्ये रूपांतर करण्याचे काम सुरू आहे. या प्रणाली स्थलांतराच्या तांत्रिक प्रक्रियेमुळे १ जून ते १५ जून २०२६ या कालावधीत महाडीबीटी पोर्टलवरील विविध सेवा तात्पुरत्या स्वरूपात बंद राहणार आहेत.




या कालावधीत लाभार्थ्यांना आवश्यक कामे करता येणार नसल्याने त्यांची गैरसोय टाळण्यासाठी अर्ज क्रमांक अद्ययावत करण्याची मुदत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता लाभार्थ्यांना १५ जुलै २०२६ पर्यंत एसएएस पोर्टलवर अर्ज क्रमांक अपडेट करता येणार आहे.

दिव्यांग सक्षमीकरण विभागाने सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुधारित मुदतीची नोंद घेऊन आवश्यक कार्यवाही वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच पात्र दिव्यांग लाभार्थ्यांनी या वाढीव मुदतीचा लाभ घ्यावा. .

पान १ वरुन

## पनवेलच्या वीज समस्येवर उच्चस्तरीय बैठक




पनवेल तालुका हा राज्यातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या भागापैकी एक आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, औद्योगिक व व्यावसायिक वाढ, मोठ्या प्रमाणातील गृहनिर्माण प्रकल्प, वाढती लोकसंख्या आणि नागरी विस्तार यामुळे विजेची मागणी सातत्याने वाढत आहे, मात्र सध्याची वितरण यंत्रणा या वाढत्या मागणीच्या तुलनेत अपुरी पडत असल्याचे दिसून येते. त्यामुळे ही समस्या केवळ तात्पुरत्या दुरुस्तीपुरती मर्यादित न ठेवता दीर्घकालीन आणि नियोजनबद्ध पद्धतीने सोडविणे अत्यावश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर आपण या विषयात वैयक्तिक लक्ष घालून महावितरणच्या वरिष्ठ अधिकऱ्यांना ठोस, कालबद्ध आणि निधीसह कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश द्यावेत तसेच पनवेल विभागातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय व आर्थिक मान्यता तातडीने देण्यात यावी, अशी मागणीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. यावर मंत्री मेघना बोर्डीकर यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना यासंबंधी कार्यवाहीचे निर्देश दिले.

राज्यमंत्री साकोरे–बोर्डीकर म्हणाल्या की, तिसऱ्या मुंबईचा विकास जलद गतीने होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विकास प्रक्रियेवर लक्ष ठेवले आहे. महावितरणच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी धोकादायक ठिकाणांचा सर्व्हे करून तातडीने सर्व कामे पूर्ण करावीत. पनवेल महापालिका क्षेत्रातील महावितरणच्या उपकेंद्रामध्ये ज्या कंत्राटदारांनी कामे व्यवस्थित केली नाहीत अशा कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकावे. कामोठे येथील सेक्टर २५ येथे उपकेंद्राच्या सुरू असलेल्या बांधकामासाठी अतिरिक्त आराखडा तयार करण्यात यावा.

कामोठे परिसरात वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी ५ एमव्हीए ट्रान्सफॉर्मर तातडीने कार्यान्वित करावा तसेच उर्वरित ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम तत्काळ पूर्ण करावे. कळंबोली शहरात सद्यस्थितीला तीन किलोमीटर एवढ्या लांबीची प्राप्त झालेल्या केबलचे काम सुरू करावे तसेच धोकादायक ठिकाणांचा सर्व्हे करावा, अशा सूचना राज्यमंत्री साकोरे–बोर्डीकर यांनी दिल्या.

### 'नैना'संदर्भातील प्रलंबित प्रश्नांवर बैठक

बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही तातडीने सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांच्या भावना व अपेक्षा लक्षात घेऊन त्यांच्या प्रश्नांवर समाधानकारक तोडगा काढण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आली. ग्रामस्थांच्या प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रशासन सकारात्मक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# ब्राह्मण मंडळातर्फे रोह्यात पुरुषोत्तम याग

**रोहा : प्रतिनिधी**

ब्राह्मण मंडळ रोहा तर्फे आधिक मासाचे औचित्य साधून मातोश्री मंगल कार्यालय रोहा येथे श्री पुरुषोत्तम याग व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, सर्व ज्ञातीबांधवानी या उपक्रमाला चांगला प्रतिसाद दिला.

अधिक मास म्हणजे आत्मशुद्धी व भक्ती यांचे प्रतीक मानले जाते या अधिक मासाच्या निमित्ताने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.रोह्यातील ख्यातनाम वेदमूर्ती मंदार पेंडसे गुरुजी व सर्व ब्रह्मवृंदाँच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम संपन्न झाला.

या उपक्रमाला रोह्याच्या नगराध्यक्षा वनश्री शेडगे,माजी नगराध्यक्ष समीर शेडगे,गटनेते महेंद्र गुजर, सभापती महेंद्र दिवेकर, नगरसेवक अजित मोरे, रोशन चाफेकर,अमित घाग, धावीर देवस्थान विश्वस्त समिती अध्यक्ष ॲड. प्रशांत देशमुख, उपाध्यक्ष नितीन परब, सचिव मकरंद बारटके, मोतीशेठ जैन, मनोज जैन, मिलिंद पिंपळे आदींनी भेट देऊन दर्शनाचा लाभ घेतला.उपक्रम यशस्वी होण्यासाठी ब्राह्मण मंडळ रोहा कमिटी, महिला मंडळ व ज्ञातीबांधवानी अथक परिश्रम घेतले.



# मुंबई मराठी पत्रकार संघाचे विविध पुरस्कार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वर्धापनदिनी पत्रकार संघातर्फे दरवर्षी देण्यात येणारे पत्रकारितेतील विविध पुरस्कारांचे मानकरी जाहीर करण्यात आले आहेत. ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक व यूएनआय वृत्तसंस्थेचे महाराष्ट्रातील माजी ब्युरो चीफ जयंत माईणकर, एबीपी माझाच्या वृत्तनिवेदिका ज्ञानदा कदम, महाराष्ट्र टाइम्सचे माजी मुद्रितशोधक दिगंबर सावंत, दै. सामनाचे वृत्तछायाचित्रकार संदीप पागडे, दै. नवराष्ट्रचे रामकृष्ण खांदारे आणि पत्रकार राजेंद्र साळसकर यांना यंदाचे पुरस्कार जाहीर झाले आहेत. पुरस्कारांचे यंदाचे ३६ वे वर्ष आहे.

रोख रुपये दहा हजार, सन्मानचिन्ह, शाल–श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असेल, अशी माहिती पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी दिली. सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता होणाऱ्या पत्रकार संघाच्या ८४ व्या वर्धापन दिन सोहळ्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. या समारंभास द प्रिंटचे संपादक ज्येष्ठ पत्रकार शेखर गुप्ता हे महनीय प्रवक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा समारंभ पत्रकार भवन, आझाद मैदान, मुंबई ४०० ००१ येथे संपन्न होईल.

यंदापासून पत्रकार संघाने बहुभाषिक ज्येष्ठ पत्रकार साहित्यिक स्व. शरद वैद्य यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, सर्वोत्कृष्ट निवेदक – सूत्रसंचालकासाठी (अँकर) पुरस्कार सुरू केला आहे. या पहिल्या पुरस्कारासाठी एबीपी माझाच्या वृत्त निवेदिका ज्ञानदा कदम यांची निवड करण्यात आली आहे. या समारंभात वयाची पासष्ट वर्षे पूर्ण केलेले पत्रकार संघाचे ज्येष्ठ सदस्य यांनाही पत्रकार संघाचे सन्माननीय सदस्यत्व आणि सन्माननीय सहसदस्यत्व दिले जाणार आहे.

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वर्धापनदिनी पत्रकार संघातर्फे दरवर्षी देण्यात येणारे पत्रकारितेतील विविध पुरस्कार आज संघाचे अध्यक्ष श्री. संदीप चव्हाण यांनी जाहीर केले. पुरस्काराचे यंदाचे मानकरी पुढीलप्रमाणे आहेत.

शोधपत्रकारितेसाठी दिला जाणारा 'पद्मश्री यमुनाताई खाडिलकर स्मृती पुरस्कार' : रामकृष्ण खांदारे (दै. नवराष्ट्र)वृत्तपत्रात काम केलेल्या ज्येष्ठ मुद्रितशोधकास दिला जाणारा 'कविवर्य प्रा. भालचंद्र खांडेकर' पुरस्कार : श्री. दिगंबर सावंत (महाराष्ट्र टाइम्समधून निवृत्त).सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रदीर्घ कार्य केल्याबद्दल दिला जाणारा 'समतानंद अनंत हरि गद्रे' पुरस्कार : श्री. राजेंद्र साळसकर

वृत्तपत्र छायाचित्रकार म्हणून प्रदीर्घ कामगिरीबद्दल दिला जाणारा 'ॲड. अधिक शिरोडकर पुरस्कृत तोलाराम कुकरेजा वृत्तछायाचित्रकार' पुरस्कार : श्री. संदीप पागडे (दै. सामना)ज्येष्ठ पत्रकार/संपादकास दिला जाणारा 'युगारंभकार, सर्वोदयी कार्यकर्ते मधुसूदन सीताराम रावकर स्मृती पुरस्कार' : श्री. जयंत माईणकर (राजकीय विश्लेषक आणि यूएनआय वृत्तसंस्था महाराष्ट्रचे माजी ब्युरो चीफ).

## पनवेलमध्ये रायगड मॉडेल जिल्हा कार्यशाळा उत्साहात

# डिजिटल आरोग्य क्रांतीचा निर्धार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक व परिणामकारक आरोग्य सेवा देण्यासाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रात आयुष्मान भारत डिजिटल मिशन राबवले जात आहे. या अंतर्गत रायगड जिल्ह्याची 'मॉडेल जिल्हा' म्हणून निवड करण्यात आली असून मंगळवारी (दि. ९) पनवेल येथील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात रायगड मॉडेल जिल्हा उद्घाटन कार्यशाळेचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले.

राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाचे सीईओ डॉ. सुनीलकुमार बर्नवाल यांनी मार्गदर्शन करताना सांगितले, "आरोग्य व्यवस्थेचे डिजिटलायझेशन झाल्यास नागरिकांना सुलभ व पारदर्शक सेवा मिळतील. रायगडमधील सर्व सुविधा तळागाळापर्यंत पोहोचवूनच हा जिल्हा खऱ्या अर्थाने 'मॉडेल जिल्हा' बनेल. यासाठी रोडमॅप बनवून रोगप्रतिबंधात्मक आरोग्याकडे वाटचाल करायची आहे." राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळी वैद्यकीय आरोग्य व्यवस्थापनविषयक सॉफ्टवेअरचे स्टॉल्स मांडण्यात आले होते. मान्यवरांनी त्यांची पाहणी केली. यावेळी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाचे संचालक डॉ. पंकजकुमार अरोरा, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन, अतिरिक्त अभियान संचालक जगन्नाथ वीरकर, सहसंचालक डॉ. सुनीता गेहोलोत, उपसंचालक डॉ. अशोक नांदापूरकर, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, डॉ. अनिलकुमार भगत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वाती नेहुलकर, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, मनपा मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी आदी उपस्थित होते. सचिव ई. रवींद्रन यांनी महाराष्ट्राने दिलेले योगदान व पुढील नियोजन मांडले. "रायगडमधील यशस्वीतेनंतर संपूर्ण राज्यात हे मॉडेल राबवण्याचे उद्दिष्ट आहे," असे ते म्हणाले.

डॉ. पंकजकुमार अरोरा यांनी मिशनची तांत्रिक बाजू तर डॉ. जगन्नाथ वीरकर यांनी प्रशासकीय कार्यवाहीचे सादरीकरण केले. रायगड जिल्ह्यातील ३८३ शासकीय आरोग्य संस्थांमध्ये आधीच 'ABDM-संलग्न HMIS' प्रणाली कार्यान्वित आहे. आता खासगी आरोग्य संस्थांनाही यात सहभागी करून घेतले जाणार आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वाती नेहुलकर यांनी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेच्या कामाची माहिती दिली.

आरोग्य क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी, शासकीय-खासगी वैद्यकीय अधिकारी व IMA चे पदाधिकारी असे सुमारे ६५० प्रतिनिधी कार्यशाळेत सहभागी झाले. आभा आयडी निर्मिती, हेल्थ फॅसिलिटी रजिस्ट्री, हेल्थकेअर प्रोफेशनल रजिस्ट्री यांसारख्या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. रायगडची 'मॉडेल जिल्हा' म्हणून निवड डिजिटल आरोग्य क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरणार आहे. यातील सर्वोत्तम कार्यपद्धती इतर जिल्ह्यांसाठी दीपस्तंभाचे काम करतील, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

### डिजिटल आरोग्य मोहिमेत पनवेल मनपाची गरुडझेप

*आयुष्मान भारत डिजिटल मिशनच्या उत्कृष्ट कार्याबद्दल पनवेल पालिकेस मागील वर्षी राज्यस्तरीय पुरस्काराने गौरवण्यात आले. कार्यशाळेत मनपाने केलेल्या कामाचे सादरीकरण झाले. मनपाच्या २६ आरोग्य केंद्रांचे ABDM अंतर्गत प्रमाणीकरण पूर्ण झाले. २३४ कर्मचाऱ्यांची नोंदणी झाली असून सर्व संस्था e-Sushrut Lite प्रणालीमध्ये कार्यान्वित आहेत. खासगी क्षेत्रात १,७१३ वैद्यकीय अधिकारी, ३,५७३ नर्स, १९२ औषधनिर्माते व ११६ प्रयोगशाळा तंत्रज्ञ असे एकूण ५,५९४ आरोग्य व्यावसायिकांची नोंदणी पूर्ण झाली. २२० पैकी १४७ खासगी आरोग्य संस्थांची नोंदणी पूर्ण असून उर्वरित संस्थांचे ऑनबोर्डिंग सुरू आहे.*

# लग्नाच्या तगाद्यावरून महिलेची हत्या

## दोन महिन्यांनी आरोपीला अटक




**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

तब्बल दोन महिन्यांपूर्वी चिंचवलीजवळ सापडलेल्या अनोळखी महिलेच्या मृतदेहाची ओळख पटवून आरोपीला अटक करण्यात पनवेल तालुका पोलिसांना यश आले आहे. करण नामदेव पाटील (रा. फडके पाडा, शिळफाटा, ठाणे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

११ एप्रिल रोजी पनवेल-दुन्द्रे रस्त्यालगत वनविभागाच्या जागेत झुडपामध्ये एका अनोळखी महिलेचा जळालेल्या अवस्थेतील मृतदेह आढळला होता. पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. महिलेची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले, आजूबाजूच्या गावांमध्ये चौकशी केली, मात्र ओळख पटत नव्हती. तपासादरम्यान पोलिसांनी २००हून अधिक मिसिंग महिलांची पडताळणी केली. तांत्रिक तपासात मिळालेल्या माहितीच्या आधारे शिळ-डायघर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अनितादेवी भगवान राजभर (३०) या महिलेची ओळख पटली.

पोलिसांनी तिच्या संपर्कातील संशयित करण पाटीलला ताब्यात घेऊन त्याच्या मोबाइलची तपासणी केली. त्यात तो मृत महिलेच्या संपर्कात असल्याचे निष्पन्न झाले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. अनितादेवीने लग्नाचा तगादा लावल्याने व त्याला लग्न करायचे नसल्याने ६ एप्रिल रोजी करण पाटीलने तिच्या डोक्यात लोखंडी रॉडने वार करून हत्या केली. पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह कारमधून चिंचवली गावच्या हद्दीत आणला. कारमधील पेट्रोल काढून ते प्रेतावर ओतून मृतदेह जाळला, अशी माहिती पोलिसांनी दिली. आरोपीला न्यायालयात हजर केले असता पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. पुढील तपास पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.



### प्लेटलेट दान

**पनवेल : मागील काही वर्षांपासून नियमितपणे प्लेटलेट्स दान करणाऱ्या श्रीराम जोशी यांनी नुकतेच खारघर येथील टाटा हॉस्पिटलमध्ये २७५वे प्लेटलेट दान केले. त्यांच्या या दातृत्वामुळे एका गरजू रुग्णाला जीवन जगण्यास मदत होणार आहे.**



**पनवेल : लोकनेते दि.बा. पाटील २७ गाव विमानतळ कृती समितीचे खजिनदार संतोष पवार यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपचे योगेश लहाने यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.**

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त

# सिसमॅक चॅम्पियन्सचा सन्मान




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिसमॅक आयटी सोल्युशन्स प्रा. लि. कंपनीच्या वतीने त्यांचा २१वा वर्धापन दिन आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त एका विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कंपनीसाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना "चॅम्पियन्स २०२६" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नवीन पनवेल येथील शगुन बँक्वेट येथे झालेल्या या सोहळ्यास पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील आणि भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा कोकण सहसंयोजक सय्यद अकबर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचप्रमाणे नगरसेवक समीर ठाकूर, गणेश कडू, समाजरत्न सुधीर सुर्वे, सीकेटी कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सदस्य अ‍ॅड. राहुल घरत, भारती विद्यापीठ नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्य वैशाली जाधव, जावेद मुलानी, नासिर खान, वैभव कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपसभापती भूपेंद्र पाटील म्हणाले, "आज फिरोज सय्यद यांच्या ब्ल्यू रूट लॉजिस्टिक्स कंपनीच्या लोगोचे अनावरण झाले. ही कंपनी पंचक्रोशीत अनेक रोजगार निर्माण करणार आहे. फिरोज सय्यद व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे मी अभिनंदन करतो आणि पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देतो." सय्यद अकबर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले, "सिसमॅक आयटी सोल्युशन्सचे संचालक फिरोज सय्यद यांचे कौतुक करावे तितके थोडे आहे. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या आव्हानात्मक क्षेत्रात त्यांनी तब्बल २१ वर्षे सजग सेवा दिली आहे. जागतिक मंदीचा फटका बसूनही अनेक आस्थापनांनी कामगार कपात, वेतन कपात केली, पण फिरोज सय्यद यांनी प्रामाणिकपणे काम करत सिसमॅकला एका उंचीवर नेऊन ठेवले आहे."

नानाविध अभीष्टचिंतन कार्यक्रमांमध्ये व्यस्त असणाऱ्या लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या कार्यक्रमासाठी फोनवरून शुभेच्छा दिल्या तसेच फिरोज सय्यद व त्यांच्या सहकाऱ्यांना यशस्वी वाटचालीसाठी सदिच्छा आणि आशीर्वाद दिले.

### यांचा झाला यथोचित गौरव

या सोहळ्यात अर्चना कडू यांना 'सिसमॅक चॅम्पियन ऑफ द इयर २०२६' हा मानाचा किताब प्रदान करण्यात आला. एक लाख २५ हजार रुपये रोख, आयफोन १७ भूपेंद्र पाटील व सय्यद अकबर यांच्या हस्ते देण्यात आला. 'बेस्ट कस्टमर सर्विस अवॉर्ड २०२६' फैजल अन्सारी यांना ५० हजार रुपयांसह प्रदान करण्यात आला. नाविद हुर्झुक यांना 'मोस्ट कमिटेड एम्प्लॉयी अवॉर्ड' ५० हजार रुपये, सना सय्यद यांना एक लाख २५ हजार, अर्जुन कांबळे यांना एक लाख ५० हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात आले.

# कामोठ्यातील सहा अनधिकृत टपऱ्या जप्त

## पनवेल मनपा 'क' प्रभागात अतिक्रमणविरोधी कारवाई



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'क' अंतर्गत कामोठे परिसरात अतिक्रमणविरोधी विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान खांदेश्वर रेल्वे स्थानक परिसरातील अनधिकृत टपऱ्यांवर कारवाई करून त्या जप्त करण्यात आल्या तसेच पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यात आला.

महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागांमध्ये अतिक्रमणाविरोधात कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त मंगेश चितळे यांनी दिल्या आहेत. त्यानुसार खांदेश्वर रेल्वे स्थानक परिसर आणि किया शोरूमसमोरील पदपथावरील अनधिकृत टपरी तसेच मारुती स्वीट कॉर्नर परिसरातील पदपथावरील अनधिकृत टपरीवरदेखील कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण सहा अनधिकृत टपऱ्या जप्त करण्यात आल्या. अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेहमाळे व उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने व प्रभाग अधीक्षक दशरथ भंडारी यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली.

# मागासवर्गीय शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलींचे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, ग्रीन पार्क सोसायटीसमोर सेक्टर १०, प्लॉट नंबर २१, कळंबोली, पनवेल येथे कार्यरत आहे. या वसतिगृहात २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता मोफत प्रवेश देण्यात येणार असून इच्छूक विद्यार्थिनींनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, पनवेल येथील गृहपाल उषा गुजेला यांनी केले आहे.

या वसतिगृहामध्ये इ. ८ वीपासून गरीब, हुशार, होतकरू, मागासवर्गीय अनु.जाती ८५ टक्के, अनु. जमाती तीन टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमाती पाच टक्के, आर्थिक मागास व इतर मागासवर्गीय दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील विद्यार्थिनी पाच टक्के व विशेष मागास प्रवर्ग दोन टक्के यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. वसतिगृहात विद्यार्थिनींकरिता मोफत निवासव्यवस्था असून दररोज पोहे, शिरा, उपीट यापैकी एक, उकडलेली दोन अंडी, सफरचंद, ऋतुमानानुसार एक फळ व दूध असा नाष्टा तसेच भोजन व्यवस्थेमध्ये जेवण (डाळ, भात, चपाती, भाजी, उसळ, लोणचे, पापडसह आठवड्यातून दोन वेळा मांसाहार) देण्यात येते.

दरम्यान, अभ्यासाकरिता लागणारी वह्या, पुस्तके शैक्षणिक व लेखन साहित्यदेखील विनामूल्य पुरविले जाते. तसेच दैनंदिन व वैयक्तिक खर्चाकरिता म्हणून दरमहा ११५० निर्वाहभत्ता दिला जातो. शालेय व गणवेशपात्र विद्यार्थिनींना दोन संचांकरिता गणवेश भत्ता दिला जातो. याव्यतिरिक्त रेनकोट, छत्री भत्ता, संगणक, ग्रंथालय सुविधा, क्रीडा साहित्य, मनोरंजन अशा सुविधा उपलब्ध आहेत.

# पावसाळ्यापूर्वी अमरधामची गॅस दाहिनी सुरू करा

## प्रभाग क्रमांक १८चे अध्यक्ष महेश सरदेसाई यांचे महापौरांना निवेदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अमरधाम स्मशानभूमी येथील गॅस दाहिनी सध्या नादुरुस्त अथवा अपूर्ण क्षमतेने कार्यरत असल्यामुळे अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गॅस दाहिनी बंद असल्याने अंत्यसंस्कार प्रक्रियेत विलंब होत असून नागरिकांची गैरसोय वाढली आहे. यासंदर्भात प्रभाग क्रमांक १८ चे अध्यक्ष महेश सरदेसाई यांनी पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांना मंगळवारी (दि. ९) निवेदन सादर करून तत्काळ दुरुस्ती व देखभालीची मागणी केली.

यावेळी राजा चव्हाण, सचिन नाझरे आणि सुधीर देसाई उपस्थित होते. पावसाळा लक्षात घेता गॅस दाहिनीची तांत्रिक तपासणी करून त्वरित दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत यासाठी दाहिनीची नियमित देखभाल व तपासणी करण्याची आवश्यकतादेखील निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन महापौर नितीन पाटील यांनी या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

# उरणमध्ये बळीराजाची शेती मशागतीसाठी लगबग

**उरण : वार्ताहर**

मृग नक्षत्राची चाहूल लागताच आणि पावसाळा जवळ येताच उरण तालुक्यातील शेतकऱ्यांची शेती मशागतीसाठी लगबग सुरू झाली आहे. शेताचे बांध व्यवस्थित करणे, बांधांच्या खांडी बुजवणे, भात रोपांच्या वाफ्यांसाठी राब भाजणे आणि शेतातील कचरा वेचून जमीन साफ करणे, अशा कामांमध्ये सध्या शेतकरी व्यस्त आहेत. उन्हाचा कडाका तीव्र असतानाही या काळ्या मातीतून पुन्हा सोने उगवण्यासाठी बळीराजा शेतात घाम गाळत आहे.

खाडी पट्ट्यातील काही शेतकऱ्यांनी सुक्या भात पेरणीची व मशागतीची कामे वेगाने सुरू केली आहेत, तर गोड्या पाण्याच्या भागातील शेतकरी मान्सून सक्रिय होण्याची वाट पाहत असून, पावसाचा अंदाज घेऊनच पेरणी करणार आहेत.



## संपादकीय

# विक्रमी वाटचाल

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारने कार्यकाळाची यशस्वी १२ वर्षे पूर्ण केली आहेत. मोदींच्या तिसऱ्या कार्यकाळाला ९ जून रोजी दोन वर्षे पूर्ण झाली तर, दिवंगत माजी पंतप्रधान पंडित नेहरू यांचा सलग ४३९८ दिवस पंतप्रधानपदी राहण्याचा विक्रमही पंतप्रधान मोदी बुधवारी मोडत आहेत. देशाच्या पंतप्रधानपदी सलगपणे सर्वाधिक काळ राहण्याचा विक्रम पंतप्रधान मोदी यांच्या नावावर आता नोंदला जाणार आहे.

**केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रगल्भ नेतृत्वाला बारा वर्षे पूर्ण झाली आहेत. २०२४ मध्ये ९ जून रोजी नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली आणि भारतीय राजकारणात इतिहास घडवला. जनतेने पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांच्याबद्दल विश्वास व्यक्त करत रालोआला सत्ता दिली. अंत्योदय म्हणजे समाजातील शेवटच्या घटकाचा विकास या तत्त्वाने प्रेरित होऊन, अनेक दशकांपासून विकासापासून वंचित राहिलेल्या लोकांपर्यंत प्रगतीचे फायदे पोहोचवणे हाच मोदी सरकारचा अविरत प्रयत्न राहिला आहे. मोदी सरकारची बारा वर्षे म्हणजे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक बदलांची गाथा आहे. गतिमान निर्णय घेत मोदी सरकारचा तिसरा कार्यकाल सुरू असून २०४७ पर्यंत विकसित भारताचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी मोदी सरकार आता तिप्पट वेगाने पावले उचलत आहे. कल्याण, विकास, सुरक्षा आणि आत्मनिर्भरता या चार स्तंभावर हा प्रवास आधारित असून तो येत्या काळात अधिक गतिमानच होईल. कलम ३७०, राममंदिर, नोटबंदी यांसारख्या निर्णयांचा देशाच्या राजकारणावर मोठा परिणाम झाला, पण पंतप्रधान मोदी यांच्या दूरदर्शी व खंबीर नेतृत्वाखालील रालोआ सरकारने राजकारणासह प्रशासनातही आमूलाग्र बदल केले आहेत. या बदलांचे दृश्य परिणाम आज देशभरात दिसत आहेत. गरीब, शेतकरी, महिला आणि युवा यांच्या कल्याण आणि सक्षमीकरणासाठी अनेक महत्त्वाचे उपक्रम राबवले गेले आहेत. गेल्या १२ वर्षांत २५ कोटींहून अधिक लोकांना दारिद्र्यरेषेच्या वर आणले गेले आहे. ८१ कोटी लोकांना दर महिन्याला मोफत धान्य मिळते आहे. पीएम आवास योजनेअंतर्गत ४ कोटींहून अधिक कुटुंबांना हक्काचे घर मिळाले आहे. तसेच पीएम जनधन योजनेअंतर्गत ५८ कोटींहून अधिक बँकखाती उघडली गेली आहेत तर ५७ कोटींहून अधिक लोकांना विनातारण कर्ज देण्यात आले आहे. त्याचबरोबर ११ कोटींहून अधिक महिलांना उज्ज्वला गॅस जोडणीचा लाभ मिळाला आहे. 'बेटी बचाओ बेटी पढाओ'पासून सुरुवात करून देशातील महिला आज केवळ सहभाग घेताना नव्हे तर नेतृत्व करतानाही दिसत आहेत. स्वच्छ भारत अभियान, पीएम आवास योजना, जलजीवन मिशन आणि आयुष्मान भारत यांसारख्या योजना केवळ घोषणा नव्हत्या तर लोकांचे जीवनमान सुधारण्याच्या आणि त्यांना सन्मान देण्याच्या उद्देशाने त्या राबवल्या गेल्या. जनधन खाती, डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फर आणि डिजिटल प्लॅटफॉर्म यांमुळे सरकारी मदत कोणत्याही मध्यस्थाशिवाय थेट आणि पारदर्शक पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचते आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराला मोठा आळा बसला आहे. नक्षलवादाविरुद्ध कठोर कारवाई सुरू असून देश अधिक सुरक्षित करण्यावर सरकारचा भर आहे. नवा भारत दहशतवादाविरुद्ध केवळ प्रतिक्रिया देऊन स्वस्थ बसणारा नाही तर तो निर्णायक उत्तर देतो हा संदेश ऑपरेशन सिंदूरने संपूर्ण जगाला दिला आहे. गेल्या १२ वर्षांत केंद्र सरकारने तुष्टीकरणाचे राजकारण न करता गरिबांचे कल्याण हेच आपले प्राथमिक ध्येय मानले आहे.**

# मान्सूनचे आगमन आणि निसर्गचक्रातील नवचैतन्य

आभाळात काळे ढग दाटून येतात, विजांचा कडकडाट होतो आणि मृदगंधाने आसमंत भारून जातो, तेव्हा समजते की पावसाळा दाराशी आला आहे. भारतीयांसाठी पाऊस हा केवळ ऋतू नसून तो एक भावना, एक उत्सव आणि जीवनदायी वरदान आहे. उन्हाच्या तीव्र झळांनी होरपळलेल्या धरित्रीला जेव्हा पहिल्या सरींचा स्पर्श होतो, तेव्हा सारी सृष्टी नव्या उमेदीने बहरून येते. सध्या देशाच्या अनेक भागात मान्सूनचे आगमन झाले असून, पुढील काही दिवसांत तो संपूर्ण देश व्यापणार आहे. भारतातील पाऊस हा नैऋत्य मान्सून वाऱ्यांमुळे पडतो. मे महिन्याच्या शेवटी हिंदी महासागर आणि अरबी समुद्रावरून बाष्पयुक्त वारे भारताच्या दिशेने वाहू लागतात.



जूनच्या पहिल्या आठवड्यात केरळमध्ये दाखल होणारा मान्सून पुढे दोन शाखांमध्ये विभागला जातो. अरबी समुद्र शाखा कोकण, गोवा, गुजरात आणि मध्य भारताला व्यापते, तर बंगालच्या उपसागराची शाखा ईशान्य भारत, पश्चिम बंगाल, बिहार आणि उत्तर भारतात पाऊस घेऊन जाते. सह्याद्रीच्या पर्वतरांगांमुळे कोकणात तुफान पाऊस पडतो, तर घाटमाथ्याच्या पलीकडे पर्जन्यछायेच्या प्रदेशात कमी पाऊस होतो. ही निसर्गाची किमयाच आहे. भारतातील ६०% पेक्षा जास्त शेती आजही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे मान्सूनचा अंदाज हा शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. पेरणीपासून ते काढणीपर्यंत प्रत्येक टप्पा पावसावर अवलंबून असतो. भात, ज्वारी, बाजरी, मका, कापूस, सोयाबीन, तूर, मूग यांसारखी खरीप पिके मान्सूनच्या पाण्यावरच तरारून येतात. चांगला पाऊस झाला की शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर समाधान पसरते. शेततळी भरतात, विहिरींची पाणीपातळी वाढते आणि रब्बी हंगामासाठीही पाण्याची बेगमी होते. म्हणूनच पाऊस म्हणजे बळीराजाच्या स्वप्नांना मिळणारे बळ होय.

पावसाळ्याने निसर्गाचे रूपच पालटून टाकले. रखरखीत, उघडे-बोडके दिसणारे डोंगर हिरव्या मखमलीने आच्छादले जातात. सुकलेले ओढे, नाले खळखळून वाहू लागतात. धबधबे कोसळू लागतात आणि रानफुलांचा गालिचा सर्वत्र पसरतो. मोर थुई-थुई नाचू लागतो, बेडकांचा आवाज घुमू लागतो आणि हवेतील गारवा मनाला सुखावतो. लहान मुले कागदाच्या होड्या करून पाण्यात सोडतात, तरुणाई भिजण्याचा आनंद लुटते. गरम चहा आणि कांदाभजीची चव या दिवसांत अधिकच वाढते. श्रावण महिन्यातील हिरवाई, धुक्याने झाकलेले घाट आणि पावसात न्हाऊन निघालेले गड-किल्ले पाहण्यासाठी पर्यटकांची पावले आपसूकच निसर्गरम्य ठिकाणांकडे वळतात.

पाऊस हा आपल्या सर्व जलस्रोतांचा मुख्य आधार आहे. धरणे, तलाव, नद्या, विहिरी हे सर्व पावसाच्या पाण्यावरच अवलंबून असतात. शहरांमधील पाणीपुरवठा, उद्योगधंदे आणि वीजनिर्मिती यासाठीही पावसाचे पाणी आवश्यक आहे. त्यामुळे पावसाच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वाढत्या शहरीकरणामुळे आणि सिमेंटच्या जंगलांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याचे प्रमाण कमी झाले आहे. म्हणूनच 'जलसंधारण' काळाची गरज बनली आहे. छतावरील पावसाचे पाणी संकलन, शेततळी, बंधारे बांधणे आणि पारंपरिक पाणी साठवण पद्धतींचा अवलंब करणे गरजेचे आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मंत्र प्रत्येकाने आचरणात आणला पाहिजे.

पावसाळा आनंद देणारा असला तरी या काळात आरोग्याची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. दमट हवामानामुळे जंतुसंसर्ग आणि साथीचे आजार वाढतात. साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती होते, ज्यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारखे आजार पसरतात. त्यामुळे घराच्या आसपास पाणी साचू देऊ नये. उकळून किंवा फिल्टर केलेले पाणी प्यावे. बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाणे टाळावे. पावसात भिजल्यास लवकरात लवकर कोरडे कपडे घालावेत. विजांच्या कडकडाटात झाडाखाली थांबू नये. नदी-नाल्यांना पूर आल्यास पाण्याचा अंदाज न घेता त्यात उतरू नये. थोडीशी काळजी घेतल्यास पावसाळ्याचा मनमुराद आनंद लुटता येतो.

पावसाळा हा मराठी मनाला भावणाऱ्या अनेक सण-उत्सवांना घेऊन येतो. आषाढी एकादशीला पंढरीच्या विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वारकरी दिंड्या-पताका घेऊन पायी चालत जातात. श्रावण महिना तर सणांनी भरलेला असतो. नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोपाळकाला, जन्माष्टमी आणि बैलपोळा हे सण शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या जीवनात आनंद पेरतात. श्रावणातील मंगळागौरी, जिवतीची पूजा यांसारख्या परंपरा आजही आवर्जून पाळल्या जातात. भाद्रपदात येणारा गणेशोत्सव तर अवघ्या महाराष्ट्राचा लाडका सण. या सर्व सणांमुळे पावसाळ्याचे दिवस अधिकच चैतन्यमय होतात.पाऊस हा निसर्गचक्रातील एक अविभाज्य आणि अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. तो धरतीची तहान भागवतो, अन्नधान्य पिकवतो आणि सर्व सजीवांना जीवन देतो.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

### 'या' ग्रहातून येतो कुजलेल्या अंड्यासारखा वास; वाचा माहिती

आपल्या सूर्य मालिकेच्या बाहेत हजारो लाखो असे ग्रह आहेत, ज्यांच्याबाबत वैज्ञानिक हळूहळू माहिती गोळा करत आहेत. शास्त्रज्ञांना एक अश्या ग्रहाची माहिती मिळाली आहे त्याच्यातून कुजलेल्या अंड्यासारखा वास येतो. जॉन्स हॉपकिन्स युनिव्हर्सिटीच्या शास्त्रज्ञांना या ग्रहाच्या वैशिष्ट्यांची माहिती मिळाली आहे.



ग्रहाचे नाव HD १८९७33 b आहे. त्याच्या वातावरणात हायड्रोजन सल्फाइड आहे. हे तेच आम्ल आहे ज्याचा वास कुजलेल्या अंड्यासारखा येतो. शास्त्रज्ञांचा निष्कर्ष नेचर मॅगजीनमध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. आणखी काही माहितीदेखील या ग्रहाबाबत मिळाली आहे.

HD 189733 b वर गेली अनेक वर्ष वैज्ञानिक संशोधन करत आहेत. हा पृथ्वीपासून ६४ प्रकाशवर्ष दूर आहे आणि विपरीत वातावरणामुळे हा जास्त प्रसिद्ध आहे. हा ग्रह त्याच्या ताऱ्याच्या खूप जवळून परिभ्रमण करतो. पृथ्वीवरील दोन दिवस म्हणजे या ग्रहावरील एक वर्ष होय. कारण इतकाच वेळ या ग्रहाला त्याच्या ताऱ्याभोवती एक चक्र पूर्ण करण्यासाठी लागतो.

ताऱ्याच्या खूप जवळ असल्यामुळे या ग्रहाचे तापमान १,७०० डिग्री फॅरेनहाइट म्हणजे जवळपास ९२७ डिग्री सेल्सियस इतकं आहे. इथे ८०४७ किलोमीटर वेगाने वारे वाहतात आणि काचेचा वर्षाव होतो. म्हणजे इथे पाण्याच्या ऐवजी काचेचा पाऊस पडतो. त्यामुळे हा एक नक्कीच विचित्र ग्रह आहे आणि म्हणूनच शास्त्रज्ञ या ग्रहाचा जवळून आभास करत आहेत.

अंतराळात असेलल्या सर्वांत मोठ्या अब्जार्व्हेटरी जेम्स वेब स्पेस टेलिस्कोप (JWST)च्या मदतीनं वैज्ञानिकों को या ग्रहाबाबत जास्त माहिती मिळाली आहे. जेम्स वेबद्वारे मिळेलल्या या डेटाच्या मदतीनं शास्त्रज्ञांना ग्रहावर हायड्रोजन सल्फाइडची माहिती मिळाली आहे. त्यांना ग्रहावर ऑक्सीजन आणि कार्बन सोर्सेजची माहिती मिळाली आहे.

शास्त्रज्ञांना या ग्रहावर जड धातूची देखील माहिती मिळाली आहे, जो बुध ग्रहाच्या वजनाइतक्या आहेत. रिपोर्ट्सनुसार, कऊ १८९७३३ ल वर जीवन असणं कठीण आहे, कारण याचे तापमान खूप जास्त आहे. तसेच ग्रहावर हायड्रोजन सल्फाइडचं अस्तित्व भविष्यात फायदेशीर ठरू शकतं.

# भारतीय बॅडमिंटनपटू प्रकाश पदुकोण



## निमित्त

प्रकाश पदुकोण हे भारतीय बॅडमिंटनचे प्रणेते म्हणून ओळखले जातात. १९८०मध्ये त्याला जागतिक क्रमवारीत प्रथम क्रमांक मिळाला. त्याच वर्षी ऑल इंग्लंड बॅडमिंटन चॅम्पियनशिप जिंकणारे ते पहिले भारतीय बनले. प्रकाश पदुकोण यांनी त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत विजयी सिलसिला सुरू ठेवला आणि १९८९मध्ये खेळाडू म्हणून निवृत्त होण्यापूर्वी २०हून अधिक आंतरराष्ट्रीय पदके जिंकली. निवृत्तीनंतरही त्यांनी खेळात सक्रिय सहभाग घेतला आणि १९९३ आणि १९९६मध्ये भारतीय राष्ट्रीय बॅडमिंटन संघाचे प्रशिक्षक म्हणून काम केले. त्यांच्या प्रचंड समर्पणासाठी आणि त्यांनी देशाला दिलेला गौरव, प्रकाश पदुकोण यांना १९७२मध्ये अर्जुन पुरस्कार आणि १९८२मध्ये पद्मश्रीने सन्मानित करण्यात आले.

पदुकोण क्रीडा व्यवस्थापनाची स्थापना प्रकाश पदुकोण यांनी २००२मध्ये तरुण बॅडमिंटन खेळाडूंना प्रशिक्षण देण्यासाठी केली होती. प्रकाश पदुकोण यांचा जन्म १० जून १९५५ रोजी बेंगळुरू, कर्नाटक येथे झाला. त्यांचा जन्म अशा वेळी झाला जेव्हा भारत बॅडमिंटनबद्दल फारसा उत्साही नव्हता. खरं तर, दक्षिण भारतात बॉल बॅडमिंटन नावाच्या खेळाचे जास्त वेड होते, जो व्हॉलीबॉलसारखाच आहे. त्यांचे वडील रमेश पदुकोण यांनी बॅडमिंटन खेळाची सुरुवात केली. त्यांनी अनेक वर्षे म्हैसूर बॅडमिंटन असोसिएशन चे सचिव म्हणून काम केले. पदुकोणची पहिली अधिकृत स्पर्धा १९६२मध्ये कर्नाटक राज्य ज्युनियर चॅम्पियनशिप होती. कोर्टवर 'जेंटल टायगर' म्हणून ओळखला जाणारा, बॅडमिंटन जगतात त्याची कामगिरी उल्लेखनीय आहे. तो फक्त १६ वर्षांचा असताना त्याने इंडियन नॅशनलमध्ये पहिला राष्ट्रीय पुरुष एकेरी जिंकला (त्याने नॅशनलमध्ये ज्युनियरचे विजेतेपदही जिंकले) आणि १९७१ ते १९७९पर्यंत सलग नऊ वर्षे जिंकले.


१९८० हे त्याचे सर्वोत्तम वर्ष होते. डॅनिश ओपन आणि स्वीडिश ओपन जिंकण्यासाठी त्याने शीर्ष युरोपियन खेळाडूंवर वर्चस्व राखले. ऑल-इंग्लंडमध्ये तिसरे मानांकित, त्याने उपांत्य फेरीत मॉर्टन फ्रॉस्टला आणि फायनलमध्ये लिम स्वि किंगला सरळ गेममध्ये पराभूत केले, अशा प्रकारे हा अभूतपूर्व पराक्रम करणारा तो पहिला भारतीय ठरला.

१९९१मध्ये स्पर्धात्मक खेळातून निवृत्ती घेतल्यानंतर, प्रकाश पदुकोण यांनी थोड्या काळासाठी भारतीय बॅडमिंटन संघटनेचे अध्यक्ष म्हणून काम केले. याव्यतिरिक्त, त्यांनी १९९३ ते १९९६ पर्यंत भारतीय राष्ट्रीय बॅडमिंटन संघाचे प्रशिक्षक म्हणून काम केले. त्यांनी गीत सेठी सोबत ऑलिम्पिक गोल्ड क्वेस्टची सह-स्थापना केली, ही संस्था भारतातील ऑलिम्पिक खेळांच्या प्रचारासाठी समर्पित आहे.

आज सायना नेहवाल, पी.व्ही. सिंधू यांच्यासारखे खेळाडू बॅडमिंटन गाजवत आहेत ,ऑलम्पीक मध्ये ही डंका गाजवला पण त्यांच्याही पूर्वी या खेळात भारताचे नाव जागतिक पातळीवर नेण्यात प्रकाश पदुकोण यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे योगदान कदापि नाकारता येणार नाही.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### पावसाळ्यात मुलांना डब्यात काय द्यायचं?

पाऊस आणि शाळा सुरू होणं हे अगदी हातात हात घालूनच येतात. नुकतीच शाळा सुरू होते आणि हळूहळू पाऊसही जोर धरू लागतो. कितीही काळजी घेतली, सांभाळलं तरी अचानक जोरात पाऊस येणं, भिजणं आणि मग किरकोळ तब्येतीच्या तक्रारी सुरू होणं हे शालेय विद्यार्थ्यांमध्ये, विशेषतः लहान वयाच्या मुलांमध्ये खूप कॉमन आहे. त्यात मुलांच्या खाण्याच्या बदलत्या सवयी अजून भर घालतात. त्यामुळे त्यांना शाळेत डब्याला काय द्यायचं असा प्रश्न महिलांना हमखास पडतो.




खूप उष्ण असणारं हवामान तीन चार दिवस सलग पाऊस पडला की एकदम गार होऊन जातं. पहिले काही दिवस जमिनीतून उष्ण वाफा निघत असतात, धूळ धुतली जात असते. पाणी एकदम गढूळ होऊन जातं. हे पाणी पचायला जड असतं आणि शरीरात अम्लता निर्माण करणारं असतं. त्यामुळे पोटाचे आजार, पचनाच्या तक्रारी, सिडिटी असे त्रास उद्भवतात. लहान मुलांमध्ये असं पाणी चुकून जरी पिण्यात आलं तरी पाण्यातून पसरणारे आजार पट्कन होण्याची शक्यता असते. जुलाब होणे, उलट्या होणे, पोट दुखणे, गॅसेस, टायफॉइड असे विविध आजार या दूषित पाण्यामुळे होऊ शकतात.

पचन शक्ती मंदावलेली असताना खाण्यात काही जड पदार्थ आले तर शरीर ते पचवू शकत नाही आणि पोट गुबारणे, काहीच खाण्याची इच्छा न होणे हेही या दिवसांत पहायला मिळते.

पावसात भिजून अंगावर ओले कपडे दीर्घकाळ राहिले, तर तो थंडावा बाधतो आणि सर्दी खोकला ताप या आजारांना निमंत्रण देतो.

अशावेळी करायचं काय, तर ज्या ज्या वेळी शक्य आहे त्या वेळी मुलांना गरमच खायला द्या, लहान मुलांच्या शाळा थोड्या उशीरा असतात व लवकर सुटतात. त्यांना घरुन काहीतरी गरम व पौष्टिक खाऊ घालून पाठवणे आणि पुन्हा घरी आल्यावर गरम खाऊ घालणं हा उत्तम उपाय आहे पण हा प्रॅक्टिकली दर वेळी शक्य होईलच असं नाही पण जेव्हा शक्य होईल तेव्हा तसा प्रयत्न नक्की करावा.

हवेत गारवा आल्यावर लहान मुलांना सर्दी खोकला वारंवार होतो आणि एका मुलाकडून दुसऱ्याला असं सारखं याची लागण होत राहते. त्यामुळे गार पदार्थ, आंबट पदार्थ अजिबात देऊ नयेत.

# रायगडात शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

उन्हाळी सुट्ट्या संपून १५ जूनपासून शाळा सुरू होणार आहेत. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होणार असल्याने विद्यार्थ्यांबरोबर शाळा ही सज्ज होताना दिसत आहेत. शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव राबविण्यात येणार असून, शाळांचा परिसर सजविण्याते येत आहेत.




पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत, प्रभातफेरी, पुस्तके वाटप करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्याचबरोबर एकही बालक शाळाबाह्य राहणार नाही याची काळजी घेतली जात आहे.रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना शासनाकडून पाठ्यपुस्तके देण्यात येतात. ही पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी मिळतील असे नियोजन करण्यात येत आहे.

सरकारच्या बालभारती विभागाकडे शिक्षण विभागाने पुस्तकांची मागणी केली होती. सरकारकडून पुस्तके प्राप्त झाली असून, ही पुस्तके तालुक्याच्या गटशिक्षण अधिकार्यांमार्फत केंद्रप्रमुख व केंद्रप्रमुखांच्या माध्यमातून मुख्याध्यापकांकडे सुपूर्द करण्यात येत आहेत. रायगड जिल्ह्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या २ लाख २५६ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहेत.

जिल्ह्यात एकही शाळाबाह्य विद्यार्थी राहणार नाही या दृष्टीने शिक्षण विभागामार्फत पाऊले उचलण्यात येत आहेत. १५ जून रोजी शळा सुरु होणार आहेत. त्यापूर्वी ६ ते १४ वयोगटातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहू नये, यासाठी प्रवेश पात्र बालकांच्या याद्या ग्रामपंचायत व शाळा फलकावर प्रदर्शित करण्यात येणार आहेत

विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांमार्फत स्वागत करण्यात येणार आहे. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना पुष्प देऊन स्वागत करण्यात येईल. गावात, वार्डात प्रभातफेरी काढण्यात येईल. या प्रभातफेरीत युवक, गावकरी, जेष्ठ नागरिकांना प्रभातफेरीमध्ये सहभागी होण्याची विनंती करण्यात येणार आहे.

# माणगाव येथील सोनाली साळवेची महसूल सहाय्यकपदी निवड

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील अंकुश साळवे यांची कन्या कु.सोनाली अंकुश साळवे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश संपादन करून तिची महसूल सहाय्यकपदी निवड करण्यात आली आहे. सोनालीच्या या उज्वल यशाबद्दल तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



कु.सोनाली साळवेचे प्राथमिक शिक्षण पाली येथे झाल्यावर पुढील शिक्षण रोहा येथे घेऊन नंतर अशोकदादा साबळे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज माणगाव याठिकाणी तिने महाविद्यालयीन शिक्षण घेतले. नंतर पुढे तिने पुणे येथे बीटेक केले.

यानंतर तिने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडून घेण्यात येणाऱ्या एमपीएससीच्या परीक्षेची तयारी घरातूनच ऑनलाईन क्लासद्वारे केली. एमपीएससी परीक्षेची तयारी करताना तिने अथक परिश्रम घेत जिद्द व ध्येय मनात ठेवली. हि परीक्षा मेहनतीच्या व जिद्दीच्या जोरावर यशस्वी उत्तीर्ण होऊन आपली ध्येयपूर्ती केली.

आपल्या या यशाबद्दल प्रसार माध्यमांजवळ बोलताना सोनाली म्हणाली कि,कोणतेही क्षेत्र निवडताना आजच्या मुला-मुलींनी ध्येय,उद्दिष्ट नजरेसमोर ठेऊन अथक परिश्रम घेतले तर यशाची प्राप्ती हि निश्चितच होत असते. माझ्या या यशात माझे आई - वडील यांची मेहनत तसेच त्यांनी वेळोवेळी मला केलेले मार्गदर्शन मोलाचे ठरले.

# पेझारीत भरधाव टँकरच्या धडकेत उद्घाटनापूर्वीच बियर शॉपी जमीनदोस्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-वडखळ मार्गावरील पेझारी चेकपोस्ट परिसरात मंगळवारी सकाळी झालेल्या अपघातात भरधाव टँकरने रस्त्यालगत उभारण्यात आलेल्या बियर शॉपीला जोरदार धडक दिल्याने संपूर्ण दुकान जमीनदोस्त झाले. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी दुकानमालकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, अलिबागकडून मुंबईच्या दिशेने जाणारा एक टँकर पेझारी चेकपोस्टजवळ आला असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे टँकर थेट रस्त्याच्या कडेला नव्याने उभारलेल्या बियर शॉपीवर जाऊन आदळला. धडकेची तीव्रता इतकी मोठी होती की काही क्षणांतच दुकानाचा मोठा भाग कोसळून जमीनदोस्त झाला.

या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेनंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.`.विशेष म्हणजे, पेझारी येथील नितीन धुमाळ यांनी ही बियर शॉपी नव्याने उभारली होती. बुधवारपासून व्यवसाय सुरू होणार होता. उद्घाटनाची सर्व तयारी पूर्ण झाली होती. दुकानात मोठ्या प्रमाणावर मालसाठाही भरून ठेवण्यात आला होता.

# धाटाव एमआयडीसीत अंधारामध्ये रस्त्यावर उभ्या केमिकल टँकरमुळे अपघाताचा धोका

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील विविध कारखान्यांच्या बाहेर केमिकल वाहतूक करणारे टँकर व इतर अवजड वाहने सार्वजनिक रस्त्यावर उभी राहत असल्याने अपघाताचा धोका वाढला असून नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः पावसाळ्याच्या सुरुवातीच्या काळात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरते. अशा परिस्थितीत रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या अवजड वाहनांमुळे वाहनचालकांना मोठा धोका निर्माण होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.



दरम्यान रविवारी सायंकाळी धाटाव औद्योगिक क्षेत्रातील एक्सेल कंपनीच्या बाहेर गुजरात व मध्य प्रदेश येथून आलेले केमिकल टँकर दीर्घकाळ रस्त्यावर उभे असल्याचे निदर्शनास आले. यापैकी GJ १० TY ६५६२ क्रमांकाचा टँकर गावालगतच्या वळणाजवळ उभा करण्यात आला होता. स्थानिक नागरिक संकेत मोरे (रा. तळाघर) यांनी चालकाकडे विचारणा केली असता, कंपनीच्या सुरक्षा विभागाकडून काही वेळाने वाहन आत घेतले जाईल, अशी माहिती चालकाने दिली.

मात्र रात्री उशिरापर्यंत संबंधित वाहन रस्त्यावरच उभे राहिल्याने नागरिकांनी पुन्हा सुरक्षा कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली. त्यावेळी वाहनातील केमिकलचा नमुना (सॅम्पल) रिजेक्ट झाल्यामुळे ते कंपनी परिसरात प्रवेश करू शकत नसल्याचे सांगण्यात आले. तसेच वाहन अधिकृत पार्किंगमध्ये हलविण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती देण्यात आली. परंतु तोपर्यंत अनेक तास सार्वजनिक रस्त्यावर वाहन उभे राहिल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त करण्यात आली.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, एक्सेल कंपनीसह बेक केमिकल, रोहाडाय, युनिकेम, सुदर्शन आदी औद्योगिक आस्थापनांच्या बाहेरही वारंवार मोठ्या प्रमाणात केमिकल टँकर व अवजड वाहने रस्त्यालगत उभी राहत असतात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतोच, शिवाय अपघाताचा धोका देखील वाढतो. याहून गंभीर बाब म्हणजे काही वाहनचालक हे मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याच्या तक्रारीही नागरिकांनी केल्या आहेत. त्यामुळे अशा वाहनांना अभय कोणाचे, असा सवाल उपस्थित होत असून संबंधित चालकांवर आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना भाजप धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे म्हणाले, "औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांनी आपल्या वाहतुकीचे आणि पार्किंगचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. सार्वजनिक रस्त्यावर केमिकल टँकर उभे करून नागरिकांच्या जीवाशी खेळणे योग्य नाही.

# अधिक मासानिमित्त विधवा भगिनींसाठी मेहेंदळे कुटुंबातर्फे आगळावेगळा कार्यक्रम

**रोहा : प्रतिनिधी**

मेहेंदळे कुटुंबाने विधवा भगिनीसाठी अधिक मास निमित्त आगळा वेगळा अनोखा कार्यक्रम केला. त्यांनी स्नेहसंमेलन भरवून त्यामध्ये या भगिनींचा सन्मान केला. अधिक मासात मेहेंदळे कुटुंबान अनेक कार्यक्रम केले आहेत. यंदा अधिक मासात आगळ वेगळा कार्यक्रम करण्याचे ठरविले. सर्व समाजात आपल्या भगिनी विधवा आहेत. त्यांना आपण वेगळे समजतो. घरातसुद्धा सर्वांच्या बरोबरीने त्यांना धार्मिक सण समारंभात



त्या पुढे -पुढे करीत नाहीत. त्यांना पाहिजे तसे प्राधान्य मिळत नाही. आपल्या अश्या भगिनींना एकत्र बोलावून गेट टुगेदर करण्याचे ठरविले. रोहे येथे भाटे वाचनालयाच्या हॉल मध्ये सर्व भगिनींचे स्वागत केले. सुरवातीला सौ. उमा मेहेंदळे यांनी कार्यक्रमांची रूपरेषा सांगितली. श्रीमती आशा ओक, अनुराधा धुमाळ, संगीता वेदपाठक, सुषमा भावे, अंजली घोसाळकर आणि हेमंत ओक यांनी गाणी, भजन आणि मनोगते व्यक्त केली.सर्व भगिनींना फुलझाडे, दक्षिणा देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यांत आला. माजी मुख्याध्यापक स. रा. मेहेंदळे यांनी प्रास्ताविक केले. अधिक मासा निमित्त एक आगळा वेगळा अनोखा स्तुत्य उपक्रम केल्या बद्दल समाधान व आंनद मिळाला. विभा चोरगे यांनी अनेक गृहिणींना योगासनाचे व आरोग्य विषयक शिक्षण देण्याचे आवश्यक असे उत्कृष्ठ मार्गदर्शन करीत असल्या बद्दल विशेष कौतुक केले. नगराध्यक्ष वनश्री शेडगे नगराध्यक्षा म्हणून उत्कृष्ठ काम करीत असल्या बद्दल त्यांचे कौतुक केले.

# स्वामी समर्थ मठात अन्नदान करून वाढदिवस साजरा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

प्रशांत बाळाराम खाने मु.खाने आंबिवली मोहोपाडा यांनी आपला वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत खालापूर तालुक्यातील श्री स्वामी समर्थ मठ, पलसदरी येथे साजरा केला.

यावेळी श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेऊन पूजा-अर्चा करण्यात आली. वाढदिवसानिमित्त मठात अन्नदानाचा उपक्रम आयोजित करण्यात आला. अनेक भाविक व गरजू बांधवांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी कुटुंबीय, मित्रपरिवार, सहकारी व स्वामी भक्तांनी प्रशांत खाने यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.



"वाढदिवस हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून समाजासाठी काहीतरी चांगले करण्याची संधी आहे," अशी भावना प्रशांत बाळाराम खाने यांनी व्यक्त केली.धार्मिक व सामाजिक वातावरणात मठात अन्नदानाचा उपक्रम पार पडल्या बद्दल आणि या कार्यक्रमामुळे उपस्थित भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

# तळा तालुक्यात पेरणीला बळीराजाकडून सुरुवात



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात गेल्या दोनत दिवसांपासून खरीपाच्या पेरणी करण्यास सुरुवात झाली आहे.मात्र हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजाने मान्सून पावसाला १५ जून नंतर सुरूवात होईल.त्यमुळे शेतकऱ्यांनी थोडे थांबून नंतर पेरणी करावी असे वातावरण मान्सून पावसाने दिसत आहे.

सध्या अनेक ठिकाणी मानसून पुर्व पाऊस पडत असल्याने अनेक भागात शेतकरीवर्ग भातपेरणी करण्यात व्यस्त झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.वरकस जमिन तालुक्यात अधिक प्रमाणात असल्याने धुळवड पेरणी मोठ्या प्रमाणात होत आहे.

शेतकरी वर्गाशी चर्चा केली असता पाऊस जवळ आला आहे.असे काही ठोकताळे यांवरून सांगत आहेत.

त्यामधे कावळे घरटे बांधणे,पक्षांचा आवाज,काजवे येणे इत्यादी घटनांमुळे पाऊस जवळ आला आहे.दोन दिवसांनंतर सर्वच ठिकाणी पेरणीला सुरूवात केली जाईल, असे म्हणत आहेत.


**महावितरण** | **निविदा सूचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग रोहा कार्यालया अंतर्गत असणारे लघुदाब व उच्चदाब वाहिन्या यांच्या प्रीव्हेंटिव्ह देखभाल व दुरुस्तीच्या कामा करिता वर्ष २०२६-२७ च्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नियुक्ती करणेसाठी ई-निविदा क्रमांक टी-०६ ते टी-१५, २०२६-२७ एकूण १० निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. ०९.०६.२०२६ ते १०. ०६. २०२६ पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. १०.०६.२०२६ रात्री ११.५५ वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत / शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेतस्थळावर प्रकाशित केला जाईल.

**PRO NO. 66** — **कार्यकारी अभियंता, रोहा विभाग.**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १६/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | दिघी बंदर-आधारित औद्योगिक क्षेत्र... दिघी बंदर-आधारित औद्योगिक क्षेत्रातील मुंबई-गोवा महामार्गावरील 'सर्क्युलर ओव्हरलिफ्ट'ला जोडणाऱ्या मुख्य अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे. | ₹२३९,९९,१६,६२६.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र **दिनांक** १७/०६/२०२६ ते दिनांक ०३/०८/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी **वरील कामाबाबत दिनांक** ०१/०७/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा **दिनांक** १०/०७/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

**४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल**

**कर्जदार/जामीनदार/गहाणवटदार यांना ६० दिवसांची सूचना**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ च्या कलम १३(२) अन्वये सूचना**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार यांनी दि पनवेल अर्बन को-ऑप. बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, सदर कायद्याच्या कलम १३(२) अन्वये मागणी सूचना पारित करून, याखालील सूचिबद्ध कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधी यांच्याकडे संबंधित मागणी सूचने/नांमध्ये उल्लेखिलेल्या रकमा, खाली दिलेल्या तपशिलानुसार, संबंधित सूचने/नांच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत भरणा करण्याची मागणी केली आहे.

वरील संबंधात, याद्वारे कर्जदार/जामीनदार यांना पुन्हा एकदा सूचना देण्यात येते की, त्यांनी सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत त्यांच्या संबंधित नावांसमोर दर्शविलेल्या रकमा, खाली नमूद केलेल्या संबंधित दिनांकांपासून परताव्याच्या आणि/किंवा संपूर्ण वसुलीच्या दिनांकापर्यंत, सदर कर्जदार/जामीनदार/गहाणवटदार यांच्याद्वारे बनविलेल्या कर्ज करारपत्र आणि इतर दस्तऐवज/लिखिते, जर असल्यास, सह वाचावयाच्या सदर मागणी सूचनांमध्ये तपशिलवार दिल्यानुसार करारात्मक दराने पुढील व्याजासह परतावा करावा.

| अ. क्र. | कर्जदार/जामीनदार/ गहाणवटदाराचे नाव | खाते क्रमांक / प्राप्त केलेल्या सुविधेचे स्वरुप / मंजुरीचा दिनांक आणि मंजूर कर्जाची रक्कम / व्याज दर | सूचना पारित केल्याच्या दिनांकापर्यंतची एकूण थकबाकी | मागणी सूचनेचा दिनांक / एनपीएचा दिनांक | तारण संपत्ती/स्थावर मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (ड) | (ई) | (फ) |
| १ | श्री. मुकेश तुकाराम डंगरकर (कर्जदार) श्री. संतोष कुमार पाणीग्रही (जामीनदार) श्री. नवनाथ रामचंद्र म्हसकर (जामीनदार) | 002002400014197 / मुदत कर्ज / १८/०३/२०२३ रु. ५,००,०००/- / १२.००% | रु. ६,२७,४९५ (रुपये सहा लाख सत्तावीस हजार चारशे पंच्याण्णव मात्र) अधिक ०१.०४.२०२६ पासूनचे पुढील व्याज | २९.०४.२०२६ / २४.१०.२०२३ | मुकेश तुकाराम डंगरकर यांच्या नावे असलेली ग्राम पंचायत उसर्ली, घर क्र. ८-ए आणि ८-बी, क्षेत्रफळ ८०.८९ चौ.मी., तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६ ही मालमत्ता. |
| २. | कु. लता बाळाराम पाटील (कर्जदार) श्री. मंगेश गंगाधर थळे (जामीनदार) श्री. संदीप भगवान मदने (जामीनदार) श्री. प्रितेश तुकाराम डंगरकर (जामीनदार) | 002002400014089 / मुदत कर्ज / २८/११/२०१७ रु. ७,००,०००/- / १३.५% | रु. ८,४२,४६७ (रुपये आठ लाख बेचाळीस हजार चारशे सदुसष्ट मात्र) अधिक ०१.०४.२०२६ पासूनचे पुढील व्याज | २९.०४.२०२६ / १४.०७.२०२० | घर क्र. १३०, ग्राम पंचायत उसर्ली, गाव उसर्ली बुद्रुक, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, क्षेत्रफळ १०५०.७४ चौ.फू. (घर क्रमांकः १३०) ४१०२०६. कु. लता बाळाराम पाटील |

*व्याजदर - सुविधा मंजुर करतेसमयी असलेला आणि आरबीआय मार्गदर्शक तत्त्वांनुसार वेळोवेळी बदलण्याच्या अधीन.

कर्जाचे हप्ते/व्याज/मुद्दल न भरल्यामुळे, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्तंभ (ई) मध्ये उल्लेखिलेल्या दिनांकास खाते अनुत्पादक मालमत्ता म्हणून वर्गीकृत झाले आहे. आम्ही स्तंभ (ई) मध्ये उल्लेखित दिनांकास हमीचे आवाहन केले आहे. बँकेस देय रक्कम व त्यावरील संपूर्ण परताव्यापर्यंतचे व्याज (यापश्चात "सुरक्षित कर्ज" असे उल्लेखित) स्तंभ (ड) मध्ये उल्लेखिल्यानुसार आहे. उपरोल्लेखित सदर सुविधेअंतर्गत थकबाकी सुरक्षित करण्याकरिता, कर्जदार/गहाणवटदारांनी, इतर बाबींसोबतच, स्तंभ (फ) मध्ये उल्लेखिलेल्या मालमत्ता/संपत्तींच्या संदर्भात प्रतिभुती हितसंबंध निर्माण केले होते. आम्ही याद्वारे कर्जदार, जामीनदार यांच्याकडे सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत स्तंभ (ड) मध्ये दर्शविलेली रक्कम, संपूर्ण परताव्यापर्यंत करारात्मक दराने पुढील व्याजासह परतावा करण्याची मागणी करीत आहोत.

असे न केल्यास, कायद्याअंतर्गत उपलब्ध असलेले बँकेचे इतर हक्क वापरण्यासोबतच, बँक **सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ (यापश्चात "कायदा" असे उल्लेखित)** च्या कलम १३(४) अन्वये देण्यात आलेल्या सर्व अधिकारांचा वापर करण्यास इच्छुक आहे. कर्जदार/जामिनदारांनी सुरक्षित कर्जाचा परतावा न केल्यास, बँकेद्वारे जप्त करावयाच्या तारण संपत्ती/त्तींचे तपशील स्तंभ (ड) मध्ये उल्लेखिल्यानुसार आहेत. **तारण संपत्ती सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार/गहाणवटदाराचे लक्ष याद्वारे वेधण्यात येत आहे.** कृपया नोंद घ्यावी की, सदर कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, सदर सूचना प्राप्त झाल्यानंतर, कर्जदार/गहाणवटदारवरील उल्लेखित कोणत्याही तारण मालमत्तांचे बँकेच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय विक्री, भाडेपट्टी किंवा अन्य मार्गे (व्यवसायाच्या सर्वसाधारण पद्धतीशिवाय) हस्तांतरण करू शकत नाहीत. कर्जदार/जामीनदार यांना अशीही सूचना देण्यात येते की, सदर वैधानिक आदेश /प्रतिबंधाचे कोणतेही उल्लंघन, सदर कायद्याच्या तरतुदींनुसार, गुन्हा आहे. कोणत्याही कारणास्तव, तारण संपत्ती व्यवसायाच्या सर्वसाधारण पद्धतीने विक्री करण्यात आल्यास, विक्री मोबदला किंवा मिळालेले उत्पन्न बँकेकडे जमा करण्यात येईल/पाठविण्यात येईल. कर्जदार/जामीनदार यांनी अशा मोबदला/उत्पन्नाचे योग्य खाते प्रस्तुत करावे. **अन्य तारण संपत्ती जप्त करण्याचे आमचे हक्क आम्ही राखून ठेवीत आहोत.**

कृपया सदर सूचनेअंतर्गत सदर मागणीचे पालन करावे आणि सर्व अप्रिय गोष्टी टाळाव्या. जर पालन न केल्यास, पुढील अवलंब केलेल्या आवश्यक कृतींकरिता, कर्जदार/गहाणवटदारांना सर्व खर्च आणि परिणामांसाठी जबाबदार धरण्यात येईल.

**सदर सूचना बँकेच्या डीआरटी/न्यायालयासमक्ष कायदेशीर कारवाई करण्याच्या पूर्वग्रहाशिवाय, परिस्थितीनुसार, पारित करण्यात येत आहे. सदर सूचना बँकेच्या डीआरटी/न्यायालयासमक्ष प्रलंबित दाव्या/खटल्यामधील बँकेच्या हक्काच्या पूर्वग्रहाशिवाय पारित करण्यात येत आहे.**

**दिनांकः ०८.०६.२०२६**
**ठिकाणः पनवेल**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**

# एपीएमसीत ‘ऑपरेशन गुटखा’

## दोन पानटपऱ्या सील, डिलिव्हरी बॉयसह माल जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई एपीएमसी भाजीपाला मार्केटमध्ये गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी कारवाई केली आहे. आर-२५ आणि आर-३२ या दोन पानटपऱ्यांमध्ये गुटखा आढळल्यानंतर त्या दोन्ही टपऱ्या सील करण्यात आल्या आहेत. या कारवाईनंतर संपूर्ण मार्केटमध्ये खळबळ उडाली आहे.

अन्न व औषध प्रशासनात आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभर दूध, खाद्यपदार्थ आणि पानटपऱ्यांवर कारवाईचा धडाका सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून मुंबई एपीएमसी मार्केटमध्येही ही कारवाई झाल्याची चर्चा आहे. कारवाईनंतर गुटखा विक्री करणाऱ्या टोळीने नवा मार्ग अवलंबल्याची माहिती समोर आली आहे. प्रत्येक



विंगमधील दुकानांपर्यंत गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थ पोहचवण्यासाठी ‘डिलिव्हरी सिस्टीम’चा वापर केला जात असल्याचे उघड झाले आहे.

या पार्श्वभूमीवर भाजीपाला मार्केटचे मुख्य सुरक्षा अधिकारी भीमराव पाटील यांनी ‘ऑपरेशन गुटखा’ राबवत कारवाई केली. या कारवाईदरम्यान एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडील बॅगांमध्ये गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ आढळले. ही सर्व सामुग्री जागेवरच जाळून नष्ट करण्यात आली. या कारवाईनंतर गुटखा विक्रेत्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे अशाच प्रकारची मोहीम इतर मार्केटमध्येही राबवावी, अशी मागणी होत आहे.

बाजार घटकांकडून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे. संबंधित टपऱ्या तत्काळ बाजार समितीकडून ताब्यात घेण्यात याव्यात, अशीही मागणी जोर धरत आहे. मार्केट परिसरात वाढत चाललेल्या गुटखा विक्रीमुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले असून कर्करोगासारख्या आजारांचा धोका वाढत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. गुटखा रॅकेटवर झालेली कारवाई केवळ सुरुवात असल्याचे बोलले जात असून यामागील संपूर्ण नेटवर्क उघड होणार का याकडे आता बाजार घटकांचे लक्ष लागले आहे.

### साखळी व्यवसायाचा होतोय आरोप

मार्केट परिसरात केवळ गुटखाच नव्हे तर तंबाखूजन्य पदार्थांचीही खुलेआम विक्री होत असल्याचे समोर आले आहे. काही टपऱ्यांमधून बिसलेरी पाणी, बिस्किटे आणि त्यानंतर गुटखा विक्रीपर्यंत साखळी व्यवसाय विस्तारल्याचा गंभीर आरोप केला जात आहे. या कारवाईनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# सानपाड्यातील वीजकपातीवर उपमहापौर भगत आक्रमक; अधिकाऱ्यांना दिली तंबी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा गाव व परिसरात वारंवार आणि रात्री-अपरात्री तासन्तास वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी प्रभाग क्र. १९ च्या नगरसेविका व 'क' प्रभाग समिती सभापती शैला जगदीश पाटील यांच्या पुढाकाराने व उपमहापौर दशरथ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला महावितरणचे सहाय्यक अभियंता गौतम सूर्यवंशी व सहाय्यक अभियंता रोशनी बॅनर्जी उपस्थित होते. "वीज ग्राहकांना कोणत्याही प्रकारे त्रास होता कामा नये," असे उपमहापौर भगत यांनी यावेळी वीज अधिकाऱ्यांना ठणकावून सांगितले.

बैठकीत नागरिकांच्या वीज संबंधित समस्या जाणून घेण्यात आल्या. उपमहापौर भगत यांनी स्पष्ट निर्देश दिले की, रात्री-अपरात्री वीज गेल्यास ती लवकर पूर्ववत करावी. त्यासाठी मुबलक कर्मचारी व आवश्यक साधन-साहित्य २४ तास उपलब्ध असावे. दुरवस्थेत आलेल्या केबल्स तातडीने दुरुस्त कराव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी नगरसेविका शिल्पा राजेश ठाकूर, माजी नगरसेविका सुनंदा पाटील, जगदीश पाटील, भालचंद्र पाटील, राजेश ठाकूर, सानपाडा दत्त मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सदानंद पाटील, अर्जुन नाईक यांच्यासह सानपाडा ग्रामस्थ, प्रभागातील ज्येष्ठ नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"सानपाडा प्रभागात रात्री-अपरात्री वीज जाते. एमएसईबीला फोन केला तरी लागत नाही. आताच्या उन्हाळ्यात तासभरदेखील लाईट जाणे खूप त्रासदायक आहे. गावात लाइटबॉक्सची दुरवस्था झाली आहे. ही बाब आधीच एमएसईबी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर पाहणी दौरा झाला व आज त्यावर बैठक संपन्न झाली," असे उपमहापौर भगत म्हणाले. या बैठकीत उपमहापौरांनी प्रभागातील सर्व सेक्टरमधील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. महावितरण अधिकाऱ्यांनी प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला. "स्मार्ट मीटरसंबंधीही महावितरणने आधी जनजागृती करावी व त्यानंतरच मीटर बसवावेत, यावरही चर्चा झाली," असे नगरसेविका शैला पाटील यांनी सांगितले.

# शालेय साहित्य थेट विद्यार्थ्यांच्या हाती!

## डीबीटी प्रक्रियेतील अडचणींमुळे महापालिकेचा निर्णय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य थेट वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मागील वर्षी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रक्रियेतील अडचणींमुळे ९३२ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळू शकला नव्हता. त्यामुळे यंदा कोणताही विद्यार्थी लाभापासून वंचित राहू नये यासाठी पनवेल महापालिकेने हा निर्णय घेतला आहे.



पनवेल महापालिकेच्या ११ शाळांमध्ये यंदा एकूण २,४१३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्यासाठी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजना राबविण्यात आली होती, मात्र अनेक विद्यार्थ्यांची बँक खाती नसणे, खात्यांची माहिती उपलब्ध न होणे तसेच विविध तांत्रिक अडचणींमुळे या योजनेचा अपेक्षित लाभ सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचू शकला नव्हता.

महापालिकेच्या शाळांमधील २,४४७ विद्यार्थ्यांपैकी केवळ १,५१५ विद्यार्थ्यांनाच शालेय साहित्याचा लाभ मिळाला होता. शिक्षण विभागाच्या प्रयत्नांनंतरही ९३२ विद्यार्थी वंचित राहिले. यामुळे विद्यार्थ्यांना शाळा सुरू झाल्यानंतर अनेक महिने साहित्याशिवाय किंवा अनेक विद्यार्थ्यांच्या पालकांनी पदरमोड करून शैक्षणिक साहित्य खरेदी केले.

या पार्श्वभूमीवर आयुक्त मंगेश चितळे यांनी डीबीटीऐवजी शालेय साहित्याची थेट खरेदी करून वाटपाचा निर्णय घेतला. पनवेल पालिकेचे शिक्षण विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिलेल्या माहितीनुसार शासनाच्या शिक्षण विभागामार्फत पाठ्यपुस्तके, गणवेश व दप्तर उपलब्ध झाल्यानंतर ते विद्यार्थ्यांना इतर शैक्षणिक साहित्य महापालिका थेट वितरित करण्यात येणार आहे.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत महापालिकेच्या मराठी, उर्दू आणि गुजराती माध्यमाच्या १० शाळांतील २,०५३ विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश, काळे शूज, सॉक्स आणि दप्तर देण्यात येणार आहेत.

# मोहोपाड्यात ‘एक दिवस भक्तीचा’

## देहदान, अवयवदान करणाऱ्यांच्या कुटुंबीयांचा गौरव

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्रीमद् जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज, दक्षिण पीठ, नाणीजधाम यांच्या प्रेरणेने रामानंद संप्रदायाच्या वतीने आयोजित ‘एक दिवस भक्तीचा’ हा भव्य आध्यात्मिक कार्यक्रम जल्लोषमय व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास हजारहून अधिक भाविक-भक्तगण उपस्थित होते. वर्षभर उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या सेवेकऱ्यांचा तसेच मरणोत्तर देहदान व अवयवदान केलेल्या पुण्यात्म्यांच्या नातेवाइकांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

त्यांच्या समाजहिताच्या कार्याचे कौतुक करून त्यांना विशेष शुभेच्छा देण्यात आल्या.



ज.न.म. संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील ठाकूर, कोकणपीठ सहाय्यक गणेशजी मोरे, अखिल भारतीय ब्लड इन नीडचे सेक्रेटरी अभिनंदन जाधव यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले. इतर मान्यवरांनीही अध्यात्म, सेवा व समाजकार्यातील विविध विषयांवर प्रेरणादायी विचार मांडले.

संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय, शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. दक्षिण रायगड जिल्हा सेवा समितीने घेतलेल्या अथक परिश्रमांमुळे हा कार्यक्रम कोकणपीठातील एक आदर्श व उल्लेखनीय उपक्रम ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दक्षिण रायगड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व सेवेकरी यांनीही विशेष परिश्रम घेतले.

# तुर्भे स्टोअर येथील ड्रेनेज व्यवस्था सुधारा

## परिसरातील नागरिकांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे स्टोअर परिसरातील गौरी क्वारी रोड येथे ड्रेनेजची योग्य व्यवस्था नसल्याने सार्वजनिक शौचालयाचे सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत आहे. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. स्थानिक नागरिकांनी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांकडे लेखी तक्रार दाखल करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

येथील सार्वजनिक शौचालयातून बाहेर पडणारे सांडपाणी ड्रेनेज लाइनमध्ये न जाता थेट रस्त्यावर साचते. त्यामुळे परिसरातील स्वच्छतेवर परिणाम होत आहे. रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या पादचारी, ज्येष्ठ नागरिक, महिला व शालेय विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सांडपाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढून डेंग्यू, मलेरियासारखे आजार पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. पालिका प्रशासनाने तत्काळ पाहणी करून ड्रेनेजची दुरुस्ती करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# टॅक्सीचालकांचा थकीत दंड माफ करावा; मंत्री सरनाईक यांच्याकडे संघटनेची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे आरटीओ अंतर्गत टॅक्सीचालकांवर ऑनलाइन ई-चलानद्वारे आकारण्यात येत असलेल्या अवाजवी दंडामुळे चालक त्रस्त झाले आहेत. वाढत्या महागाईत आणि दंडाच्या जाचक अटींमुळे सामान्य टॅक्सीचालकाला उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. त्यामुळे थकीत दंड माफ करावा, अशी मागणी श्री छत्रपती शिवाजी महाराज टॅक्सी चालक-मालक संघटनेने परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन केली आहे.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, संघटना प्रमुख बाजीरंग अवकिरकर, सरचिटणीस किसनवीर लोटेकर, अश्विन गोळे, विनायक जाधव, अशोक खामकर, संतोष कोंढाळकर, संतोष बेंद्रे,



प्रथमेश शिंदे, नंदकुमार कोठावळे उपस्थित होते.

### संघटनेच्या प्रमुख मागण्या

### थकीत दंडाची १००% माफी

सर्व्हर त्रुटी, चुकीचे सीसीटीव्ही मॅपिंग आणि आर्थिक मंदीमुळे टॅक्सी चालकांवर लाखो रुपयांचा जुना दंड जमा झाला आहे. हा दंड भरणे चालकांना शक्य नाही. त्यामुळे सर्व जुना थकीत दंड पूर्णपणे माफ करावा, किंवा 'वन-टाइम सेटलमेंट' अंतर्गत नाममात्र शुल्क घेऊन निकाली काढावा, जेणेकरून वाहनांची कागदपत्रे नूतनीकरण करता येतील.

### लेट फी रद्द करा

वाशी, ठाणे आणि मुंबई आरटीओचे 'सारथी/वाहन' पोर्टल्स अनेकदा बंद असते. या तांत्रिक त्रुटीमुळे फिटनेस प्रमाणपत्र व परवाना नूतनीकरण वेळेवर अपलोड होत नाही. मात्र आरटीओकडून ५० ते १०० रुपये प्रतिदिन याप्रमाणे अव्वाच्या सव्वा लेट फी लादली जाते, जी अन्यायकारक आहे.

### ‘ड्रॉप-पिक’ पॉईंट्सवर दंडातून सूट

इस्टर्न-वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, ठाणे-बेलापूर रोड तसेच दादर, ठाणे स्टेशन, वाशी हायवेसारख्या गजबजलेल्या भागात प्रवाशांना उतरवण्यासाठी टॅक्सी २ मिनिटे थांबली तरी सीसीटीव्ही किंवा ई-चलानद्वारे १,००० ते २,००० रुपयांचा 'नो पार्किंग'चा दंड पाठवला जातो. व्यावसायिक टॅक्सींना यातून सूट द्यावी.

### ॲग्रिगेटर कॅब्स पॉलिसीत सुधारणा

ॲप-आधारित कॅब्सवर राईड कॅन्सलेशन किंवा किरकोळ तांत्रिक तक्रारींवरून नवीन नियमावलीनुसार मोठा दंड आकारला जात आहे. या धोरणाचा पुनर्विचार करावा.

### किरकोळ चुकांसाठी दंडाऐवजी चेतावणी

मोटार वाहन नियमांनुसार ड्रेस कोड, किरकोळ स्टिकर किंवा कागदपत्र सादर करण्यास झालेला उशीरसारख्या चुकांवर थेट १,००० ते ५,००० रुपयांचा दंड न ठोठावता पहिल्या चुकीवेळी केवळ चेतावणी नोटीस द्यावी. सर्व समस्यांबाबत मंत्रालयात संघटनेच्या प्रतिनिधी मंडळासोबत आढावा बैठक आयोजित करावी, अशी मागणी मंत्री सरनाईक यांच्याकडे करण्यात आली. याबाबत सरनाईक यांनी सकारात्मकता दर्शविली आहे.

# फ्लेमिंगो पाहण्यासाठी नवी मुंबईत गर्दी : पावसाच्या चाहुलीने कच्छकडे परतीचा प्रवास

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील नेरुळ येथील एनआरआय संकुलामागील पाणथळ भागासह ठाणे खाडी परिसरातील पाणथळ क्षेत्रे सध्या हजारो फ्लेमिंगोंच्या उपस्थितीने गुलाबी रंगात न्हाऊन निघाली आहेत. दरवर्षीप्रमाणे हिवाळ्याचा मुक्काम संपवून हे स्थलांतरित पक्षी आता परतीच्या प्रवासाच्या तयारीत असल्याने त्यांना पाहण्यासाठी देश-विदेशातील पक्षीनिरीक्षक, छायाचित्रकार आणि पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे.

नवी मुंबई आणि ठाणे खाडी परिसर हे देशातील महत्त्वाच्या फ्लेमिंगो अधिवासांपैकी एक मानले जाते. दरवर्षी हजारो ग्रेटर आणि लेसर फ्लेमिंगो



हिवाळ्यात या भागात दाखल होतात. येथे उपलब्ध असलेले अन्न, विस्तीर्ण दलदली प्रदेश आणि तुलनेने सुरक्षित पाणथळ क्षेत्रे यामुळे या पक्ष्यांना अनुकूल वातावरण मिळते. साधारणपणे नोव्हेंबरच्या अखेरीस त्यांचे आगमन सुरू होते आणि मे-जूनपर्यंत त्यांचा मुक्काम या भागात असतो.

यंदा फ्लेमिंगोंच्या आगमनाला काहीसा विलंब झाला. गेल्या वर्षी पावसाळा अपेक्षेपेक्षा जास्त काळ टिकल्याने खाडी परिसरातील पाण्याची पातळी आणि पर्यावरणीय स्थितीत बदल झाला. परिणामी डिसेंबरपर्यंत फ्लेमिंगोंची संख्या कमी दिसत होती. जानेवारीनंतर परिस्थिती अनुकूल होत गेल्याने मोठ्या संख्येने फ्लेमिंगो नवी मुंबईच्या विविध पाणथळ भागांमध्ये दाखल झाले. त्यामुळे हंगामाच्या उत्तरार्धात पक्षीनिरीक्षकांना मोठ्या थव्यांचे दर्शन घडले.

सध्या फ्लेमिंगोंच्या पिसांवरील गडद गुलाबी रंग विशेष लक्ष वेधून घेत आहे. त्यांच्या आहारात असलेल्या सूक्ष्म वनस्पती, शैवाल आणि लहान जलचरांमधील नैसर्गिक रंगद्रव्यांमुळे त्यांच्या शरीराला ही गुलाबी छटा प्राप्त होते. परतीच्या प्रवासाच्या काळात हा रंग अधिक उठावदार दिसून येतो. शांत पाण्यावर पडणारी त्यांच्या गुलाबी रंगाची प्रतिबिंबे आणि एकाच वेळी उड्डाण करणारे हजारो पक्षी हे दृश्य पाहण्यासाठी या परिसरात पहाटेपासूनच नागरिकांची गर्दी होत आहे.

दरम्यान, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक आणि राज्यातील इतर शहरांतून अनेक पक्षीप्रेमी या परिसराला भेट देत आहेत. काही पर्यटक विशेषतः फ्लेमिंगोंचे छायाचित्रण करण्यासाठी येथे येत असून पहाटे आणि सूर्यास्ताच्या वेळी परिसरात सर्वाधिक वर्दळ दिसून येत आहे. पावसाची चाहूल लागताच पुढील काही दिवसांत फ्लेमिंगो आता गुजरातमधील कच्छच्या रणाकडे परतणार आहेत. तेथील विस्तीर्ण खाऱ्या जमिनी आणि नैसर्गिक वातावरणात त्यांचा प्रजनन हंगाम सुरू होतो. त्यामुळे जूनच्या मध्यापर्यंत नवी मुंबईतील त्यांची संख्या लक्षणीयरीत्या कमी होण्याची शक्यता आहे.

# आदिवासी बांधवांच्या मागण्यांची प्रशासनाने पूर्तता करावी -विवेक पंडित

**चौक : प्रतिनिधी**

आदिवासी समाजाचे अनेक प्रश्न प्रलंबित असून आदिवासी बांधव यांना आपण स्वतंत्र भारत देशात आहोत, याचीच जाणीव झाली नाही, प्रशासनाने त्यांच्या न्याय मागण्यांबाबत योग्य सहकार्य करावे असे आवाहन आदिवासी विकास आढावा समितीचे अध्यक्ष(मंत्री दर्जा) व माजी आमदार विवेक पंडित यांनी केले आहे.

राज्यस्तरीय आदिवासी विकास आढावा समिती(मंत्री दर्जा) चे अध्यक्ष विवेक पंडित यांनी खालापूर तालुक्यातील होनाड ग्राम पंचायत हद्दीतील टेंबे आदिवासी येथे पाहणी करून वन विभागाचे अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडून त्यांच्या पुनर्वसनाची माहिती घेतली.

त्या नंतर प्रशासकीय भवन खालापूर येथे आदिवासी समाजाच्या



विविध मागण्यांकरिता श्रमजीवी संघटना खालापूर यांच्या विनंतीनुसार आढावा बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. प्रशासकीय कार्यालयात विविध समस्या बाबत चर्चा करण्यात आली.तालुक्यातील स्थलांतर कुटुंब, कुपोषण,वन हक्क, आधार कार्ड ,जातीचा दाखला, शिक्षण व कामगार विभाग,पाणीटंचाई,वाढीव गावठाण विस्तार योजना, पोषण आहार,याबाबत आढावा व समस्या जाणून घेतल्या व सर्व अधिकारी यांना उपायोजना करण्याबाबत सूचना दिल्या.

यावेळी उपविभागीय अधिकारी कर्जत प्रकाश संकपाळ,तहसीलदार खालापूर अभय चव्हाण, गटविकास अधिकारी संदीप कराड,सहाय्यक कामगार आयुक्त रोशन रुमाले,प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास विभाग पेन उर्मिला गलांडे, परिक्षेत्र वन अधिकारी नथुराम कोकरे, तालुका आरोग्य अधिकारी श्रीमती कल्याणी इंगोले, गटशिक्षणाधिकारी श्रीमती दीपा परब, प्रकल्प अधिकारी महिला बाल विकास विशाल कोतागडे, उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा संतोष चव्हाण, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, विकास पवार,सहाय्यक गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे, मंडळाधिकारी भरत सावंत, ग्राम महसूल अधिकारी श्रीमती जयश्री मोरे, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, ग्रामपंचायत अधिकारी शंकर जाधव श्रमजीवी संघटना कार्याध्यक्ष बाळाराम भोईर,अध्यक्ष श्रीमती सीताबाई घाटाळ, जिल्हा संघटक श्रमजीवी संघटना रमेश वाघमारे, अनिल आखाडे व संघटनेचे पदाधिकारी इत्यादी उपस्थित होते

सदर बैठकीमध्ये अध्यक्ष विवेक पंडित यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे आदिवासी समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शासनाचे सर्व लाभ पोहोचवले जातील याबाबत प्रकाश सकंपाळ उपविभागीय अधिकारी कर्जत यांनी ग्वाही दिली.

## मुंबई–पुणे महामार्गावर विद्युत खांब तुटल्याने वाहिन्या रस्त्यावर

**चौक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार जुना मुंबई पुणे मार्गावर चौक हद्दीतील डायमंड पेट्रोलपंप येथे एक विद्युत खांब कोसळल्याने विद्युत पुरवठा खंडित झाला, पण सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही, सुदैव असे की महामार्गावर विद्युत वाहिनी तुटल्यावर त्याच वेळी कोणतेही वाहन अथवा जीव जनावर रस्ता ओलांडत नव्हते.

आज सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मुंबई पुणे रस्त्यावर चौक हद्दीत डायमंड पेट्रोलपंप येथे उभा असलेला विद्युत खांब कोसळला, हा खांब जुना मुंबई पुणे रस्ता क्रॉस करून विद्युत पुरवठा करणाऱ्या विद्युत् वाहिन्याना पलीकडेचे बाजूला जोडणारा दुसऱ्या खांबावर जोडला आहे, ही घटना घडली त्यावेळी येथील सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील सोनटक्के यांना माहिती मिळताच त्यांनी त्वरीत घटना स्थळी जाऊन मार्गावरील दोन्ही बाजुच्या गाड्यांना थांबण्याची विनंती करून विद्युत विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांना कळविले,



परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन कर्मचारी राजेश त्या ठिकाणी हजर झाले त्यांनी त्वरीत वीज पुरवठा खंडित करण्यासाठी संबंधित यांना सांगितले. आणि पुढचा अनर्थ टळला. सुदैव असे की हा खांब कोसळताना खोपोली ते पनवेल या पनवेल ते खोपोली मार्गावर एकही वाहन जात नव्हते, अथवा त्या दरम्यान गेले नाही, केवढा भयानक प्रसंग घडला असता, याची जाणीव या पुढे विद्युत मंडळानी ठेवावी, असे मत अनेकांनी व्यक्त केले.

## रोहेकरांना दिलासा; पावसाच्या आगमनाने उकाड्यापासून सुटका, शेतीकामांना वेग

**धाटाव : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उष्णतेमुळे हैराण झालेल्या रोहा तालुक्यातील नागरिकांना अखेर पावसाच्या आगमनाने दिलासा मिळाला आहे. तालुक्यात सोमवारी दुपारनंतर अनेक भागांत पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी कोसळल्या. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांनीही या पावसाचे उत्स्फूर्त स्वागत केले.



यंदाच्या मान्सूनची प्रतीक्षा शेतकरी वर्गासह सर्वसामान्य नागरिक करत होते. पावसाच्या आगमनामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून शेतीच्या पूर्वतयारीच्या कामांना वेग आला आहे. भातशेतीसह विविध पिकांच्या लागवडीसाठी आवश्यक असलेली मशागत सुरू करण्यात येत आहे.

पावसाच्या सरींमुळे परिसरातील झाडे, वनराई आणि मोकळी मैदाने हिरवाईने नटू लागली आहेत. उकाड्यामुळे घरातच थांबलेल्या नागरिकांनी पावसाचा आनंद घेत मान्सूनचे स्वागत केले. काही ठिकाणी लहान मुलेही पावसात भिजताना दिसून आली.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार आगामी काही दिवसांत तालुक्यात आणखी पावसाची शक्यता असून शेतकरी वर्गाला याचा मोठा फायदा होणार आहे. पावसाच्या आगमनाने रोहेकरांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून उष्णतेच्या झळांपासून नागरिकांची मोठ्या प्रमाणात सुटका झाली आहे.

## प्रयोगशील शेतकरी अनंत मगर यांनी फुलवली चंदनाची शेती

**रोहा : प्रतिनिधी**

शेती मध्ये वेगवेगळे प्रयोग करण्यासाठी प्रसिध्द असलेले रोहा तालुक्यातील प्रयोगशील शेतकरी अनंत मगर यांनी पावणेदोन एकरात चंदनाची शेती केली आहे. आज ती शेती भरत असताना पाच वर्षांपूर्वी लावलेले रोपटे आज मोठी होताना दिसत आहेत.



प्रयोगशील शेतकरी म्हणून अनंत मगर यांची ओळख, कलिंगड पिकासाठी ते रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध आहेत. स्थानिक बाजारपेठ मिळत असल्याने कलिंगड हे पीक आता सध्या स्थानिक बाजार विक्री करत आहेत. परंतु यापूर्वी कलिंगड हे पीक त्यांचे राज्यभारासर देशभर व जगभरात पोहोचले आहे.

एकेकाळी कोहळयाची शेती करून त्यांनी शेकडो टन कोहळा बाजारात आणला होता.काकडी सह अन्य पिकासाठी यशस्वीरित्या उत्पादन करणारे प्रयोगशील शेतकरी म्हणून अनंत मगर यांची ओळख आहे.

सतत शेतीमध्ये काहीतरी प्रयोग करायचा हा त्यांचा छंद आहे. परंतु हा प्रयोग आर्थिक दृष्ट्या फायदेशीर कसे होईल यासाठी ते सतत झटत असतात. या त्यांच्या शेतीमध्ये त्यांचं संपूर्ण कुटुंबीये मेहनत घेत असतात.अशा अनेक प्रयोगातूनच पुढे येत अनंत मगर यांनी त्यांच्या घराजवळ पावणेदोन एकरात चंदनाची शेती केली आहे. जोखीम भरलेली हे शेती असून त्यांनी हा प्रयोग करायचा निश्चित केला नंतर नियोजनबद्ध शेती करण्याचे त्यांनी ठरवले.

किल्ला येथील कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ राजेश मांजरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी चंदनाची शेती करण्याचे ठरवले. दापोली येथून आणलेली रोपे आपल्या घरात शेजारी असलेल्या पावणेदोन एकरामध्ये २८६ चंदनाची रोपे लावले आहेत.

या चंदनाच्या रोपांच्या जातीमध्ये दोन प्रकारचे रक्तचंदन, सुगंधी चंदन याची लागवड केली आहे. या प्रयोगाला पाच वर्षांपूर्वी त्यांनी सुरुवात केली होती.

या शेतीसाठी त्यांना जवळजवळ दोन लाख रुपये खर्च आला असून भविष्यातही हा खर्च वाढणार आहे. यातील काही झाडे पाच वर्षाचे झाले आहेत. तर काही ठिकाणी झाडे जगली नसल्याने त्या ठिकाणी नाव्याने लावलेली झाडे आता दोन ते तीन वर्षाची झालेली आहे. ते स्वतः व त्यांचे कुटुंबीय या शेतीकडे जातीने लक्ष देत असतात.

विविध प्रकारची शेती करत असताना खतांचे मात्रा व सेंद्रिय खत याचा ते नेहमीच या शेतीत उपयोग करत असतात. या शेतीत काही ठिकाणी फळझाडे ही त्यांनी लावले आहेत.

आता ही रोपे दोन ते पाच वर्षाच्या दरम्यान आहे. या शेतीतून काढण्यासाठी सरकार व कृषी विभागाच्या परवानगी घेतल्यानंतर ती शेती नियमानुसार पंधरा वर्षानंतर यातून त्यांना उत्पन्न मिळणार आहे. पुढील दहा वर्ष या झाडांचे जतन करायचे आहेत.

अनंत मगर यांनी शेतीमध्ये अनेक प्रयोग करून लाखोचे उत्पादन काढले आहे. हा आदर्श त्यांचा नव्या पिढीने घेण्यासारखा आहे. ते शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सतत पुढाकार घेत असतात.

## पेणच्या कासार तलावात आढळला एकाचा मृतदेह

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील कासार तलाव साई मंदिर परिसरात सोमवार दिनांक ८ जून रोजी सकाळी एका व्यक्तीचा देह आढळल्याने परिसरात काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते स्थानिक नागरिकांनी तलावात एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर संबंधित यंत्रणांना माहिती देण्यात आली

घटनेची माहिती मिळताच पेण नगरपालिकेच्या अग्निशामक दलाच्या रेस्क्यू पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली पथकाने तलावातून व्यक्तीला बाहेर काढल्यानंतर त्यांचा अंत झाल्याचे स्पष्ट झाले स्थानिक रहिवासी श्लोक म्हात्रे यांनी त्या व्यक्तीची प्रार्थमिक ओळख पटवली त्यानंतर नातेवाईकांशी संपर्क साधण्यात आला असता त्यांचे नाव प्रशांत चंद्रकांत जाधव वय ५२ वर्ष राहणार फणस डोंगरी पेण असे असल्याचे समोर आले.



## हमरापूर फाटा परिसरात महिलेचा संशयास्पद मृत्यू, खुनाचा गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील मुंबई – गोवा महामार्गालगत शितोळे आदिवासीवाडी, हमरापूर फाटा परिसरातील टेकडीवरील झाडीझुडपात एका ३५ वर्षीय महिलेचा अर्धनग्न अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिलेची ओळख आंबी जान्या जाधव (वय ३५, रा. भोगुलीं, महालमिर्या डोंगर, ता. पेण) अशी झाली आहे. संबंधित महिला काही दिवसांपासून पती व आई–वडिलांपासून वेगळी राहत असून स्वतःहून पेण येथे आली होती. सोमवारी (८ जून) मुंबई–गोवा महामार्गालगतच्या झाडीझुडपात तिचा मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळून आला. मृत महिलेच्या भावाने पेण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणातून महिलेच्या तोंडावर कठीण वस्तूने वार करून तिची हत्या केल्याचा संशय व्यक्त केला आहे. तसेच पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह अर्धनग्न अवस्थेत झाडीत टाकून आरोपी फरार झाल्याची शक्यता तपासात व्यक्त करण्यात येत आहे.

या प्रकरणी पेण पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला असून अज्ञात आरोपीचा शोध सुरू आहे.

## रिक्षाचालकांनी भोगावती पुलावर उभारला बांबूचा संरक्षण कठडा

**पेण : प्रतिनिधी**

भोगावती पुलावरील जीवघेण्या परिस्थितीकडे प्रशासनाने केलेल्या दुर्लक्षाविरोधात तीन चाकी चालक–मालक संघटना, चावडी नाका, पेण यांनी अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला.

संघटनेच्या रिक्षाचालकांनी पुलावर बांबूचा तात्पुरता संरक्षण कठडा उभारत शासनाच्या निष्क्रियतेवर थेट बोट ठेवले. विशेष म्हणजे, हा कठडा उभारण्यासाठी अंत्यविधीसाठी वापरले जाणारे बांबू गोळा करण्यात आले. त्यामुळे या आंदोलनाला अधिकच बोचरा अर्थ प्राप्त झाला आहे. 'माणसांचे प्राण वाचवण्यासाठी शासनाकडे कठडा उभारण्याची इच्छाशक्ती नाही, म्हणून आम्हालाच अंत्यसंस्काराचे बांबू वापरावे लागत आहेत,' अशी संतप्त प्रतिक्रिया चालकांनी व्यक्त केली. गेल्या ६ मे रोजी याच पुलावर खड्डा चुकवताना एक रिक्षा नदीत कोसळून चालकाचा मृत्यू झाला होता. त्यानंतर केवळ खड्डे बुजविण्याची औपचारिकता पार पडली, मात्र संरक्षण कठडा उभारण्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. रिक्षाचालकांनी उभारलेला हा बांबूचा कठडा केवळ संरक्षणासाठी नसून, तो प्रशासनाच्या संवेदनशून्य कारभारा विरुद्ध निषेधाचा फलक असल्याची चर्चा आहे.





## तब्बल २७ वर्षांनी शालेय मैत्रीचा जागर; गतकाळातील आठवणींना सहकाऱ्यांकडून उजाळा

**धाटाव : प्रतिनिधी**

मित्र मैत्रिणींचे गेट टुगेदर तसे नवे नाही. पण काही शालेय माजी विद्यार्थी दशकानंतर एकत्र येतात. गप्पाटप्पा, अगदी धमाल करतात, आठवणीत रमून जातात याचीच प्रचिती सर्वांनाच आली. पीएनपी तळाघर विद्यालयातील १९९९ चे दहावीचे मित्र मैत्रिणी तब्बल २७ वर्षांनी एकत्र येत गेट टुगेदर केले. मैत्रीचा अनोख्या उपक्रमातून जागर केला. विविध खेळ, गाणी, आठवणींच्या मनोगतात सर्वजण रमून गेले. त्यात गंमती जमती तितकीच भावूकता होती.

स्नेह मेळाव्यात दूरवर सासरी गेलेल्या मैत्रिणी सहभागी झाल्या. अगदी मध्य प्रदेश, गुजरात इतर शहरातून मैत्रिणी आल्या. रुपेश शिंदे, जगदीश बज्रे, मंगेश मोरे, सुशांत दबडे व मित्रांनी



गेट टुगेदरचे भन्नाट आयोजन केले होते. मुख्यतः गुरुवर्य दशरथ कातकर, संदीप दिवेकर, ललित पाटील यांचा माजी विद्यार्थ्यांच्या वतीने येथोचित सन्मान केला. त्यावेळी सर्वांचेच डोळे पाणावले. गुरूंची आठवण कायम ठेवली, गुरुचे ऋण व्यक्त केल्याने गुरुकडून कृतज्ञता व्यक्त झाल्याचे अधोरेखीत झाले आहे.

तळाघर येथील बयोज् ग्रीन फार्मवर रविवारी पीएनपी तळाघर १९९९ च्या दहावीतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा विविध आठवणी, धमाल मस्ती, संवादाने साजरा झाला. रुपेश शिंदे व सहकारी मित्रांनी गेट टुगेदरचे भन्नाट आयोजन केले. प्रारंभी गुरुवर्य यांसह सर्व मित्र मैत्रिणींचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. सर्वांची विचारपूस केली. ४० हुन अधिक मित्रांनी सहभाग नोंदवला. मुलींची उपस्थिती लक्षणीय होती. हरवलेली पाखरे, ते गेलेले क्षण पुन्हा सजवायला सगळेजण सज्ज झाले. गेलेले अनमोल क्षण पुन्हा जगण्याचा हट्टाहास झाला. श्रीफळ वाढवून स्नेह मेळाव्याला सुरुवात झाली.

गुरुवर्य दशरथ कातकर, संदीप दिवकर, ललित पाटील यांसह सर्वच विद्यार्थ्यांनी एकमेकांचा आपुलकीने सन्मान केला. उपस्थित विद्यार्थ्यांनी आपल्या व्यवसाय, कामाचा परिचय करून दिला. यावेळी कातकर सर यांनी माजी विद्यार्थ्यांनी आठवण केली, गुरुचा सन्मान केला, ही आयुष्यातील मोठी कमाई आहे अशी भावूकता व्यक्त केली. दिवेकर सर यांनी मुलांच्या विद्यार्थी दशेतील मजेशीर किस्से, संघर्षाचा काळ सांगत हिमतीच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी गुरूंसह सर्वांचेच डोळे पाणावले.

अनेक विद्यार्थ्यांनी आठवणींचे मनोगत व्यक्त केले. स्वप्नाली भगत हिने ते शालेय जीवनातील क्षण पुन्हा उभे राहिले असे सांगत शालेय दशेतील काळ सुखाचा अशी अप्रत्यक्ष भावना व्यक्त केली. कातकर सर यांनी गाणी गायली, त्यावर सर्वच विद्यार्थी चांगलेच थिरकले. काहींनी मजेशीर आठवणींतील किस्से सांगत हास्यकल्लोळ केला. जगदीश बज्रे यांनी कवितेतून मैत्रीच्या आठवणी जाग्या केल्या. आज अनेकजण नोकरी, व्यवसाय सांभाळत आहेत, मुली गृहणी, नोकरी, व्यवसायिक आहेत. संसारात गुंतून गेलात. तरीही वेळ काढून शालेय आठवणी जाग्या करून काही क्षण का होईना विद्यार्थी म्हणून रमल्या, जणू पुन्हा दहावीची शाळा भरली होती, असाच भास झाला.

दरवर्षी पुन्हा एक दिवस मित्र विद्यार्थी म्हणून गेट टुगेदर साजरा करू असे एकमेकांनी अभिवचन घेतले. गोड तिखट मेजवानीने गेट टुगेदरची सांगता झाली. समारोपानंतर एकमेकांनी आठवणी साठवत निरोप दिला. दरम्यान, २७ वर्षानंतर विद्यार्थ्यांचा झालेला पहिलाच गेट टुगेदर बेस्ट ठरला. सर्वदूर चर्चा झाली, विविध उपक्रमातून छान मेसेज दिला तर गेट टुगेदर सारखी ऊर्जा नाही, हीच ऊर्जा आमच्यासाठी जगण्यासाठी शिदोरी राहणार आहे अशी भावना अप्रत्यक्ष व्यक्त झाली आहे.

# ऋतुराज गायकवाडची ऐतिहासिक खेळी

## शतक झळकावत द्रविड-गंभीरच्या खास क्लबमध्ये एण्ट्री

**दांबुला : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाबाहेर असलेल्या ऋतुराज गायकवाडने आयपीएलमधील अपयशानंतर ऐतिहासिक खेळी केली आहे. श्रीलंका 'अ' संघाविरुद्धच्या सामन्यात दमदार शतक झळकावत त्याने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला.

भारत 'अ' संघाकडून खेळताना गायकवाडने संयमी आणि जबाबदार फलंदाजी करत ११२ चेंडूंमध्ये शतक पूर्ण केले. विशेष म्हणजे शतकापर्यंत पोहचेपर्यंत त्याने केवळ नऊ चौकार लगावले. त्यामुळे ही खेळी केवळ आक्रमक नव्हे तर परिपक्व आणि परिस्थितीनुसार खेळलेली होती. त्याच्या या खेळीमुळे भारताला भक्कम धावसंख्या उभारता आली. यावेळी कर्णधार तिलक वर्मासोबत त्याने शतकी भागीदारीही रचली.



### संधीचे सोने!

ऋतुराज गायकवाड आयपीएल स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्सचे नेतृत्व करताना अपयशी ठरला. त्याच्या कॅप्टन्सीवर प्रश्नचिन्ह उपस्थितीत होत असताना रियान परागने दुखापतीमुळे श्रीलंकेतील तिरंगी मालिकेतून माघार घेतल्यावर ऋतुराजला भारतीय 'अ' संघात संधी मिळाली. शतक पूर्ण करताच सहकारी खेळाडूंनी टाळ्यांच्या गजरात त्याचे अभिनंदन केले.

या शतकासह ऋतुराज गायकवाडच्या लिस्ट-ए कारकिर्दीतील शतकांची संख्या २१वर पोहचली आहे. त्यामुळे सर्वाधिक लिस्ट-ए शतके झळकावणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत त्याने राहुल द्रविड आणि गौतम गंभीर यांच्या बरोबरी साधली आहे. भारतीय क्रिकेटमधील या दोन दिग्गजांनीही आपल्या लिस्ट-ए कारकिर्दीत प्रत्येकी २१ शतके झळकावली होती. आता ऋतुराजही या प्रतिष्ठित यादीत दाखल झाला आहे.

श्रीलंका 'अ' संघाविरुद्धच्या तिरंगी मालिकेतील पहिल्या लढतीत भारताचा कर्णधार तिलक वर्माने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, पण आघाडीच्या फलंदाजांना त्याचा निर्णय सार्थ ठरवण्यात अपयश आले. वैभव सूर्यवंशीच्या रूपात भारतीय संघाला पहिला धक्का बसला. त्याने १२ चेंडूचा सामना करून फक्त १४ धावांवर विकेट गमावली. प्रभसिमरन सिंग ११ चेंडूत दोन धावा, तर प्रियांश आर्यक ३२ चेंडूत ३२ धावा करून बाद झाल्यावर भारतीय संघ अडचणीत सापडला होता. अशावेळी ऋतुराज गायकवाडने तिलकच्या साथीने दमदार भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी १८५ चेंडूंत १५० धावांची भागीदारी रचली.

# आयर्लंड, इंग्लंड दौऱ्यासाठी सिराजच्या जागी प्रसिद्ध कृष्णाचा संघात समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाच्या आगामी आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यापूर्वी संघात अचानक एक मोठा बदल करण्यात आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अधिकृत घोषणा करत वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजच्या जागी प्रसिद्ध कृष्णाचा संघात समावेश केला आहे. येत्या काही दिवसांत भारतीय संघ या दौऱ्यासाठी रवाना होणार असून यापूर्वीच जाहीर झालेल्या टी-२० संघात हा महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे.

सध्या अफगाणिस्तानचा संघ भारत दौऱ्यावर असून नुकत्याच पार पडलेल्या एकमेव कसोटी सामन्यात भारताने एक डाव आणि ३०० धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे. यानंतर दोन्ही संघांमध्ये १३ जूनपासून तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळवली जाणार आहे. ही मालिका संपल्यानंतर भारतीय संघ आयर्लंडसाठी रवाना होईल, जिथे दोन सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाईल. आयर्लंड दौरा आटोपून भारतीय संघ थेट इंग्लंडला पोहचेल, जिथे पाच सामन्यांची टी-२० मालिका आयोजित करण्यात आली आहे. याच दोन्ही दौऱ्यांवरील टी-२० मालिकेसाठी बीसीसीआयने संघात बदल केल्याची माहिती दिली आहे.



बीसीसीआयने दिलेल्या माहितीनुसार वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेचा भाग नसेल. बीसीसीआयचे वैद्यकीय पथक आणि संघ व्यवस्थापन यांच्यात झालेल्या सखोल चर्चेनंतर सिराजच्या 'वर्कलोड मॅनेजमेंट' (कार्यभार व्यवस्थापन) अंतर्गत त्याला विश्रांती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

आगामी प्रदीर्घ आंतरराष्ट्रीय क्रिकेट हंगाम लक्षात घेता खबरदारीचा उपाय म्हणून आणि सिराजला पूर्णपणे ताजेतवाने होण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. सिराज याच्या जागी आता प्रसिद्ध कृष्णाला संघात स्थान देण्यात आले असून उर्वरित संघात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# जागतिक अजिंक्यपद योगासन स्पर्धेत यजमान भारताचे वर्चस्व

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

यजमान भारताने पहिल्यावहिल्या जागतिक योगासन अजिंक्यपद स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी करत वर्चस्व प्रस्थापित केले. अहमदाबाद येथील 'एका एरिना' मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत भारताने तब्बल १०२ सुवर्णपदकांसह एकूण ११४ पदकांची कमाई करत अव्वल स्थान पटकावले.

योगासन भारत, वर्ल्ड योगासन आणि भारतीय ऑलिम्पिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत जगभरातील ७९ देशांतील ५२२ खेळाडूंनी भाग घेतला होता. जागतिक पातळीवरील या स्पर्धेत सहभागी झालेल्या ३१ देशांना किमान एक पदक मिळवता आले, तर केवळ १० देशांना सुवर्णपदकाचे खाते उघडता आले. या तगड्या स्पर्धेत भारताने १२२ सदस्यीय बलाढ्य संघ मैदानात उतरवला होता. सबज्युनिअर (१०-१४ वर्षे) ते सीनिअर-सी (४५-५५ वर्षे) अशा एकूण सहा वयोगटांत भारतीय खेळाडूंनी सुवर्ण यश खेचून आणले.

पदकतालिकेत तीन सुवर्ण, तीन रौप्य आणि पाच कांस्यपदकांसह जपानने दुसरे स्थान मिळवले. अर्जेंटिनाने तिसरे स्थान पटकावले, ज्यामध्ये त्यांच्या नबिला बाराझा हिचा मोलाचा वाटा राहिला. नबिलाने वैयक्तिक दोन सुवर्ण आणि तीन रौप्यपदके जिंकून स्पर्धेतील सर्वात यशस्वी खेळाडू होण्याचा बहुमान मिळवला.

# बेन स्टोक्सकडून नियमाचे उल्लंघन



**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंड क्रिकेट संघाने न्यूझीलंडविरूद्धची पहिली कसोटी जिंकल्यानंतर नाईट क्लबमध्ये एक घटना घडली, ज्यात इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स आणि वेगवान गोलंदाज गस एकिन्सन यांचा समावेश होता. या प्रकरणी इंग्लंड क्रिकेट बोर्ड चौकशी करीत असून अद्याप तरी याबाबत कोणती माहिती समोर आलेली नाही.

इंग्लंडचे क्रिकेटपटू आणि साराकेन्स रग्बी खेळाडूंमध्ये वाद झाला. त्यात बेन स्टोक्स आणि इंग्लंडचे काही खेळाडू सामिल होते. मिळालेल्या माहितीनुसार स्टोक्स आणि एटकिन्सन यांनी इंग्लंड संघाच्या मिडनाईट कर्फ्यू नियमाचे उल्लंघन केले. दोन्ही क्रिकेटपटू हे रग्बी खेळाडूंशी भिडले होते. रग्बी खेळाडूने एटकिन्सनला पंच मारला होता असा दावा करण्यात आला आहे, मात्र हा पंच इसीबीच्या सुरक्षा रक्षकाला लागला. हा सुरक्षा रक्षक नाईट क्लबमध्ये खेळाडूंवर नजर ठेवून होता.

## महिला टी-२० विश्वचषक स्पर्धा

# सराव सामन्यात भारताचा विंडीजवर दणदणीत विजय

**लंडन : वृत्तसंस्था**

आगामी आयसीसी महिला टी-२० विश्वचषकाच्या तयारीसाठी खेळल्या गेलेल्या पहिल्या सराव सामन्यात भारतीय महिला क्रिकेट संघाने वेस्ट इंडिजवर २६ धावांनी विजय मिळवत जोरदार सलामी दिली आहे.

प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केल्यानंतर हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील 'विमेन इन ब्लू' संघाने निर्धारित २० षटकांत आठ गडी गमावून १७९ धावांचा डोंगर उभारला. या धावसंख्येमध्ये भारती फुलमालीने संयमी पण आक्रमक फलंदाजी करत ४० चेंडूंमध्ये नाबाद ५६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. तिला स्टार सलामीवीर स्मृती मंधानाने ३९ धावांची चांगली साथ दिली.





प्रत्युत्तरात १७९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजचा संघ भारतीय फिरकी गोलंदाजीसमोर गडगडला. भारतीय संघाने शिस्तबद्ध गोलंदाजी करत वेस्ट इंडिजला २० षटकांत आठ गडी गमावून १५३ धावांवर रोखले. भारताच्या विजयात फिरकीपटू श्रेयंका पाटीलने भेदक मारा करत चार बळी मिळवले, तर राधा यादवने तिला सुरेख साथ देत तीन विकेट्स घेतल्या.

सराव सामन्यातील या विजयाने भारतीय संघाचा आत्मविश्वास उंचावला आहे. भारताचा पुढील सराव सामना यजमान इंग्लंडविरुद्ध खेळवला जाणार आहे. त्यानंतर 'विमेन इन ब्लू' संघ रविवारी एडजबॅस्टन येथे कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्धच्या लढतीने आपल्या अधिकृत विश्वचषक मोहिमेची सुरुवात करणार आहे.

## अफगाणिस्तानविरुद्ध वनडे मालिकेसाठी

# रोहित, हार्दिकच्या फिटनेस टेस्टकडे लक्ष

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने कसोटी सामन्यात अफगाणिस्तानला तीन दिवसांतच पराभूत करून कसोटी क्रिकेटमधील सर्वात मोठ्या विजयाची नोंद केली. आता भारतीय संघ १३ जूनपासून अफगाणिस्तानविरुद्ध तीन सामन्यांची वनडे मालिका खेळणार आहे.

या मालिकेतून दुखापतग्रस्त विराट कोहलीने आधीच माघार घेतली आहे. त्यात आता रोहित शर्मा आणि हार्दिक पांड्याच्या खेळण्याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. कसोटी सामन्यानंतर टीम इंडियाचे फलंदाजी प्रशिक्षक सीतांशु कोटक यांनी या स्टार खेळाडूंच्या फिटनेवर वक्तव्य केले.



अफगाणिस्तानविरुद्धच्या घरच्या मैदानातील तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना १३ जून रोजी हिमाचल क्रिकेट असोसिएशनच्या धर्मशालाच्या मैदानात खेळवण्यात येणार आहे. अफगाणिस्तानविरुद्धचा एकमेव कसोटी सामना संपल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत सीतांशु कोटक यांना रोहित शर्मा आणि हार्दिक पांड्या यांच्या फिटनेसबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. यावर त्यांनी सांगितले की, दोघांनी फिटनेस चाचणी उत्तीर्ण केली आहे की नाही याची अधिकृत माहिती अद्याप मिळालेली नाही, मात्र त्यांना मिळालेल्या माहितीनुसार दोन्ही खेळाडू पूर्णपणे तंदुरूस्त आहेत.

अफगाणिस्तानविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी रोहित शर्मा आणि हार्दिक पंड्या यांची संघात निवड करण्यात आली आहे, मात्र त्यांना अंतिम संघात स्थान मिळण्यासाठी फिटनेस चाचणी उत्तीर्ण करणे आवश्यक असेल. अलीकडेच झालेल्या आयपीएल स्पर्धेदरम्यान रोहितला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली होती, तर हार्दिक पाठदुखीने त्रस्त होता. त्यामुळे दोघांनाही काही सामन्याला मुकावे लागले. याबाबत कोटक म्हणाले की, त्यांच्याकडे अद्याप अंतिम वैद्यकीय अहवाल नाही, पण दोघेही लवकरच फिटनेस चाचणी पूर्ण करून संघासोबत जोडले जातील, अशी अपेक्षा आहे.

# भारत-इंग्लंड टी-२० सामन्यांची वेळ बदलली



**लंडन** : भारतीय संघ येत्या काही दिवसात आयर्लंड आणि इंग्लंडविरूद्ध टी-२० मालिका खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. भारतीय क्रिकेट चाहत्यांना भारत-इंग्लंड सामन्याचा थरार पाहता यावा म्हणून इंग्लंड क्रिकेट बोर्डाने सामन्याच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.

भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये होणारी टी-२० मालिका १ जुलैपासून सुरू होणार आहे. या मालिकेतील सामने आता १ तासाआधी सुरू होणार आहेत. आधी हे सामने भारतीय वेळेनुसार रात्री ११ वाजता सुरू होणार होते, पण आता भारतीय क्रिकेट चाहत्यांची गैरसोय होऊ नये, म्हणून हे सामने आता रात्री १० वाजता सुरू होणार आहेत. त्यामुळे आता क्रिकेट चाहत्यांना रात्री उशिरापर्यंत न जागता टी-२० सामने पाहता येतील.

# अर्जुन तेंडुलकरची अष्टपैलू कामगिरी



**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० मुंबई लीग स्पर्धेतील सामन्यात आर्क्स अंधेरी आणि बांद्रा ब्लास्टर्स यांच्यात रंगलेल्या लढतीत अंधेरीने नऊ गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना बांद्रा ब्लास्टर्सला १४४ धावांपर्यंतच मजल मारता आली. या आव्हानाचा पाठलाग करताना अंधेरी संघाने अवघ्या एका गड्याच्या मोबदल्यात विजयी धावसंख्या गाठली.

वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सामन्यात १४५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना आर्क्स अंधेरीची सुरुवात संथ झाली आणि तिसऱ्या षटकात सलामीवीर दिव्यांश सक्सेना २६ धावांवर बाद झाला. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या अर्जुन तेंडुलकरने सामन्याचे चित्र पूर्णपणे पालटून टाकले. अर्जुनने मैदानाभोवती चौफेर फटकेबाजी करत अवघ्या ३४ चेंडूंमध्ये चार चौकार आणि पाच गगनचुंबी षटकारांच्या मदतीने नाबाद ६६ धावांची स्फोटक खेळी साकारली. त्याला दुसऱ्या बाजूने मुशीर खानने उत्तम साथ दिली. मुशीरने ३८ चेंडूत नाबाद ५४ धावा केल्या. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी नाबाद शतकी भागीदारी करत अवघ्या १३.५ षटकांत एक बाद १४५ धावा करत आर्क्स अंधेरीला नऊ गडी राखून एकतर्फी व दणदणीत विजय मिळवून दिला. या अष्टपैलू कामगिरीसाठी अर्जुनला सामन्याचा सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरवण्यात आले.

# सूर्यकुमारची आधी दमदार खेळी, नंतर मन जिंकणारी कृती!



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताला सलग दुसऱ्यांदा टी-२० वर्ल्डकप जिंकून देणारा कर्णधार सूर्यकुमार यादवला कर्णधारपदावरुन काढून टाकण्यात आले आहे. यासह संघाबाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. फ्लॉप कामगिरीमुळे संघाबाहेर केल्यानंतर टी-२० मुंबई लीग स्पर्धेत मराठा रॉयल्स संघाविरूद्ध झालेल्या सामन्यात सूर्याने कॅप्टन इनिंग खेळून आपल्या संघाला एकहाती विजय मिळवून दिला आहे. दरम्यान, सामन्यानंतर त्याने मन जिंकणारी कृती केली आहे.

टी-२० मुंबई लीग स्पर्धेत झालेल्या सामन्यात मराठा रॉयल्स आणि ट्रायम्प नाईट्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. वानखेडे स्टेडियमवर पार पडलेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या मराठा रॉयल्स संघाचा डाव १५२ धावांवर आटोपला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या ट्रायम्प नाईट्स संघाला सुरुवातीला मोठे धक्के बसले, पण कर्णधार सूर्यकुमार यादवने ३६ चेंडूंचा सामना करत नाबाद ७२ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याने आपल्या संघाला एकहाती विजय मिळवून दिला.

दमदार अर्धशतकी खेळीच्या बळावर सूर्यकुमार यादवची सामनावीर म्हणून निवड करण्यात आली, पण मोठ्या मनाच्या सूर्यादादाने आपला सामनावीराचा पुरस्कार हा आपल्या संघातील युवा गोलंदाज सिल्व्हेस्टर डिसोझाला दिला. सूर्याने या सामन्यात धावांचा पाठलाग करताना अर्धशतकी खेळी केली, त्यामुळे तो सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला होता, पण पहिल्या डावात गोलंदाजी करताना सिल्व्हेस्टर डिसोझाने पाच गडी बाद केले होते. सूर्याने सिल्व्हेस्टर डिसोझाचे कौतुकही केले. सूर्याच्या या मन जिंकणाऱ्या कृतीमुळे कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# पश्चिम आशियातील संघर्षाचे फुटबॉल वर्ल्डकपवरही पडसाद

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

पश्चिम आशियात अमेरिकेच्या संघर्षाचे पडसाद फुटबॉलजगतावरही उमटले आहेत. फुटबॉल विश्वचषक स्पर्धेला अवघे काही दिवस उरले असतानाच इराकचा उपकर्णधार व देशाचा स्टार स्ट्रायकर आयमेन हुसेन याला विमानतळावर तब्बल सात तास ताब्यात घेऊन त्याची चौकशी करण्यात आली, तर आफ्रिकेतील रेफरी ओमर अब्दुलकादीर आर्टन यांना मियामी विमानतळावरून अमेरिकन अधिकाऱ्यांनी परत पाठवले.

पहिल्यांदाच फुटबॉल विश्वचषक स्पर्धा अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांमध्ये संयुक्तपणे खेळवली जात आहे, मात्र ती वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे.

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S
RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL, ULWE
CBSE Affiliation No. 1131483 School Code: 31472
Plot No. 01 & 02, Sector-12, Ulwe, Tal. - Panvel, Dist. - Raigad, Pin - 410206.
Contact No. 022-27212067, 7710072762,
Email: rtpsulwe@gmail.com, Website: www.rtpsulwe.com
STAFF RECRUITMENT FOR THE A.Y. 2026-2027
Applications are invited for the following positions for immediate appointment for the Academic Year 2026-27

| POSTS | QUALIFICATIONS |
|---|---|
| (PRT) English | B.A., B.Ed. with English Subject in B.A. (with at least 50% Marks). |
| (PRT) Art | A.T.D,A.M G.D.Art / B.F.A,(with at least 50% Marks). |
| Counsellor | Clinical Psychologist, RCI Registered. |
| Accountant | B. Com / M. Com in Accounting and Finance, (CPA preferred), having 02 years' experience in Accounts.Knowledge of Tally is mandatory. |
| IT Incharge | B.Sc. (IT), Diploma in Computer Hardware & Networking. |
| Nurse | Diploma in Nursing from a recognised institution and experience of working in a school. |
| Receptionist | Graduate, with good communication skills in English. |

❖ Candidates must have completed their schooling from an English Medium institution.

Note: Interested candidates should submit their resume, a passport sized photograph, and self-attested copies of all relevant documents. Applications can be sent via post to the Chairman, JBSP Sanstha, Ramsheth Thakur Public School, Ulwe at Plot No. 01 & 02, Sector-12, Ulwe, Navi Mumbai 410206.
Alternatively, applications may be submitted by email to rtpsulwe@gmail.com.
The deadline for all submissions is Thursday, 18th June, 2026.
For Additional Information Contact: 7710090800/9821537023
Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com